# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**


**गणपत्रिका क्रमांक : १६३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष बारावे / अंक ९ / मार्च २०११

## संपादकीय

### पण लक्षात कोण घेतो ?

'इन्स्टिट्यूट फॉर अमेरिकन व्हॅल्यूज' या संस्थेने २०१० साली प्रकाशित केलेल्या 'माय डॅडीज् नेम इज डोनर' या पुस्तकाने काही मूलभूत सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. याच संस्थेने 'द रिव्हॉल्यूशन इन पेरंटहूड - द इमर्जिंग ग्लोबल क्लॅश बीटवीन अॅडल्ट राइट अॅंड चिल्ड्रेन्स नीडस्' हा अहवालही १९०६ साली प्रकाशित केला होता. श्रीमंत आणि ऐहिकदृष्ट्या प्रगत पाश्चात्य राष्ट्रांच्या सांस्कृतीत जडणघडणीमध्ये होत असलेल्या बदलांचे प्रतिबिंब या अहवालात दिसून येते. विवाह आणि त्यातून निर्माण होणारे अपत्य आणि पालकत्व या सनातन संकल्पना आहेत. गेली हजारो वर्षे मानवी जीवनमूल्यांची रचना ही या सामाजिक संस्था केंद्रीभूत मानून केली गेली आहे. जगातील सर्व धर्म, पंथ यांनी या संस्थांच्या अस्तित्वाचा आग्रह आणि आदर केला आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये भौगोलिक सीमा जशा पुसट होत चालल्या तसेच सभ्यतांची सांस्कृतिक वैशिष्ट्येही लयास जायला लागली. हा प्रवास बहुतांशी एकेरी आहे आणि तो म्हणजे संस्कृती व जीवनमूल्यांचे पाश्चात्यीकरण. हे असे का होते, याच्या मूलभूत कारणांचा ऊहापोह होणे आवश्यक आहे.

सोळाव्या शतकात पाश्चात्य राष्ट्रांनी सुरु केलेला वसाहतवाद, त्यापाठोपाठ झालेली औद्योगिक आणि यांत्रिक क्रांती यांनी वर्चस्व आणि श्रेष्ठत्वाच्या संकल्पना बदलल्या, पाश्चात्य राष्ट्रांत होत असलेल्या या औद्योगिकीकरणाने मनुष्य आणि समाजाच्या हित-अहिताच्या संकल्पनाही बदलू लागल्या. माणसाचे किंवा समूहाचे यश आणि अपयश त्याच्या आर्थिक क्षमतेवर ठरु लागले. 'स्पर्धा' जीवनाच्या अस्तित्वा करता आवश्यक बनून गेली. माणसाच्या 'गरजां' करता 'यंत्रे' न येता यंत्रांच्या गरजेचा मनुष्य 'गुलाम' बनू लागला. बाजारी वस्तूंचा खप, विक्री, उपयोग हेही यामुळेच प्रगतीचे मोजमाप होऊन गेले. याच आधारावर जगाची विभागणी विकसित, विकसनशील आणि अविकसित अशा तीन गटांत करण्यात आली. या सर्वांचा पाया हा 'आर्थिक' होता. एकोणीस-विसाव्या शतकांमध्ये पाश्चात्य जगतात याच आर्थिक फायद्यातोट्याच्या गणितातून साम्यवाद आणि भांडवलशाही या संकल्पना उदयास आल्या. धर्म, वंश, सत्ता आणि वर सांगितलेले सिद्धांत यांच्या सरमिसळीवर विसाव्या शतकात पाश्चात्य जगात दोन महायुद्धे झाली आणि अनेक वेळा जगाचे नकाशे बदलले. त्यानंतर चालू झाले शीत युद्ध. या सगळ्याचा केंद्रबिंदू हा 'अर्थकारण' होता. शीतयुद्धही संपले. पण 'युद्धे' संपली नाहीत.

विसाव्या शतकापर्यंतच्या वैज्ञानिक क्रांतीचा पाया हा प्रामुख्याने 'गणित' व 'पदार्थविज्ञान' हा होता. १८५९ साली डार्विनने मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिद्धांत सोडला तर जीवशास्त्रामध्ये फारसे क्रांतिकारी बदल झाले नव्हते. २० व्या शतकाच्या मध्यापासून ही परिस्थिती बदलू लागली. १९५२ साली वॅटसन आणि क्रीक यांनी 'डी.एन.ए.'चा शोध लावून

(मलपृष्ठ २ वर)

मुखपृष्ठावरून

**संपादकीय**

जीवशास्त्रातील क्रांतीला सुरुवात केली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पुंजवाद (कांटम थिअरी) आणि सापेक्षतावादाने (थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी) अणूचे अंतरंग आणि त्यांचा परस्पर संबंध यांच्या माहितीत क्रांतिकारक बदल घडवले. डी.एन.ए.च्या रचनेच्या शोधाने हीच क्रांती पेशींच्या अंतरंगाच्या माहितीबद्दल घडली आणि पुढे जीवशास्त्रात प्रचंड क्रांती होऊ लागली. यातूनच जैवयांत्रिकीची संकल्पना रूजू झाली. यंत्राचे सुटे भाग वेगळे जमवून जसे यंत्र बनवता येते, तसे प्राणिमात्रांच्या पेशीच्या अंतरंगात बदल करून प्राण्यांच्या जनन व वर्तणुकीत बदल घडवण्यात माणसाला यश आले. प्राण्यांच्या बाबतीत मिळालेल्या यशामुळे मानवी पेशींमध्येही असेच बदल करता येतील, हा विचार सुरू झाला. स्त्रीमधील स्त्रीबीजे व पुरुषाची पुबीजे यांचा संयोग होऊन नवीन पेशीसमूह निर्माण होतो हे माहीत होतेच. पण हा स्त्री-पुरुष संयोग हा नैसर्गिक होता. प्रयोगशाळेत अनैसर्गिकरीत्या हा संयोग घडविण्याची ईर्षा शास्त्रज्ञांत निर्माण झाली आणि १९६९ साली जगातील पहिली नलिका बालिका जन्माला आली. प्रत्यक्ष मनुष्यनिर्मितीतला हा पहिला हस्तक्षेप होता. आज हे तंत्रज्ञान एवढे विकसित झाले आहे की, लाखो बालके यातून जन्माला आली. १९९८ साली क्लोनिंगचे नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आणि डॉलीचा जन्म झाला. २००० साली जनुकांच्या नकाशाची माहिती पूर्ण झाली. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांतील यंत्र क्रांतीनंतर मानवाच्या संस्कृतीमध्ये होऊ घातलेला हा बदल मात्र अधिक गंभीर आहे. मानवी नात्यांमध्ये सुरू झालेला 'संकोच' आता जवळ जवळ पुरा होत आला आहे. यामुळे 'देव' ही संकल्पना कधीच हद्दपार झाली, आता 'माणूस' ही संकल्पनाही नष्ट व्हायला लागली आहे. मानवी नात्यांचा संबंध हा 'संवेदना' केंद्रित असतो. सांस्कृतिक संवेदना बधिर झाल्या की नाती शून्य होत जातात. 'आई', वडील आणि 'पालकत्व' या फक्त संस्कृतिक संकल्पना नाहीत. मादीची 'आई' होणे किंवा नराचा 'पिता' होणे यामध्ये मानवी सभ्यतेची हजारो वर्षे खर्ची पडली आहेत. विवाह, मातृऋण, पितृऋण या संस्था आणि संकल्पना यांचा जन्म या बदलांतूनच झाला आहे. लालसा, हाव किंवा दुष्टपणा हे नैसर्गिक गुणधर्म आहेत. वात्सल्य, त्याग या सुद्धा नैसर्गिक प्रेरणा असल्या, तरी त्यांची मशागत करावी लागते. आज आपला उलटा प्रवास चालू झाला आहे. आपण आई व पित्याकडून 'नर' आणि 'मादी' कडे जायला लागलो आहोत. काही दशकांतच आपण फार मोठा 'यशाचा' पल्ला गाठला आहे. अर्थातच, प्रगतीच्या शिखरावर असलेली पाश्चात्य राष्ट्रे यात आघाडीवर आहेत, आणि त्यांचे अंधानुकरण करणारे आपण ही दरी भरून काढायाला अधिक वेगाने त्या ध्येयाकडे मार्गक्रमण करत आहोत.

मानवाच्या एका गर्भ बीज पेशीतूनच (एम्ब्रियॉनिक स्टेम सेल) वेगवेगळ्या अवयवांचे कार्य करणाऱ्या शरीर पेशी निर्माण होतात. त्यांची वेगळी कार्ये जेव्हा संतुलितपणे चालतात तेव्हाच शरीर स्वास्थ्य टिकून राहते. यकृताच्या पेशी आणि हृदयाच्या पेशी अशा एकाच पेशीतून निर्माण झाल्या असल्या, तरी संपूर्ण आयुष्यभर त्यांची कार्ये वेगळी असतात. मनुष्य हा पेशी स्तरावर जरी समान असला; तरी वय, लिंग व सामाजिक संदर्भाच्या पार्श्वभूमीवर त्याची कार्ये वेगळी असतात. ही वेगळी कार्ये संतुलितपणे होत राहिली, तरच समाज एकजिनसी आणि आनंदी राहू शकतो. हा आशय आणि पूर्वपीठिका हरवून जेव्हा 'समानतेची' संकल्पना मांडली जाते, तेव्हा ती केवळ हास्यास्पदच नाही तर संस्कृतीच्या सामाजिक गोंधळाला कारणीभूत ठरते. चेहरा हरवलेल्या या समानतेच्या युगातील व्यथाच सुरुवातीला उल्लेख केलेल्या पुस्तक व अहवालात मांडण्यात आल्या आहेत. भौतिक यशाच्या शिखरावर राहूनही या राष्ट्रातील नवीन पिढी ही व्यसनाधीन, ऐदी, संवेदनाशून्य आणि आक्रस्ताळी झालेली आहे. 'मी कोण' आणि 'कुठून आलो' याच्या शोधाला आता कुठे त्यांची सुरुवात झाली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाने मात्र हजारो वर्षांपूर्वी याची चर्चा उपनिषदांतून करून ठेवली आहे; आणि म्हणूनच आई, वडील व पालक यांच्या भारतीय संकल्पना भिन्न आहेत.

पण हे लक्षात कोण घेतो?

●●●

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष बारावे / अंक ९/ मार्च २०११

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ६ वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'विजय तेंडुलकर' एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व | - श्री. नितीन वेडगा | ३ |
| २) | गीतारहस्य | - श्रीमती आशा भिडे | ७ |
| ३) | स्पंदने युवा मनाची... | - प्रा. दामोदर मोरे | १० |
| ४) | साहित्य - जगत | - शरद जोशी | २० |
| ५) | श्री. भाऊसाहेब बांदोडकरांच्या सहवासात गोव्यातील एक दिवस | - श्री. मा. ना. पाटील | २३ |
| ६) | वेद कालीन - वर्णाश्रम पद्धती | - श्री. शं. बा. मठ | २६ |
| ७) | परिसर वार्ता | - संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## स्थूल बालकांचे संशोधन

मिशिगन मधील डेट्राइट येथील वेडन स्टेट विद्यापीठातील लहान मुलांतील स्थूलतेवर संशोधन करणारे ब्रियान मॉस व मिशिगन विद्यापीठातील ॲन आरबोर यांनी १६, ४०० मुलांचा अभ्यास करून अमेरिकन जर्नल ऑफ हेल्थ प्रमोशन मध्ये आपले संशोधन प्रसिद्ध केले. ही मुले अमेरिकेत २००१ साली जन्माला आलेली होती.

या संशोधनावर आधारित असे काही निष्कर्ष त्यांनी या शोध निबंधकात मांडले आहेत. स्थूलतेच्या संदर्भात इ. एस. सेंटर्स फॉर डीसीज कंट्रोल अँड प्रीव्हेन्शन यांनी निश्चित केलेल्या प्रमणित मानकांनुसार ३१.९% बालके (९ महिन्यांची) स्थूल व स्थूलतेकडे झुकणारी होती. २ ऱ्या वर्षापर्यंत स्थूल व स्थूलतेकडे झुकण्याचे प्रमाण ३४. ३% झाले. यापैकी ४४% बालके अजूनही स्थूल होती तर ४४% बालके कायमस्वरूपी स्थूल राहण्याच्या रेषेवर होती.

जनुकशास्त्रज्ञ व स्थूलतेचे संशोधक हॅकॉन हॅकॉनारसन यांनी हे संशोधन महत्त्वाचे असल्याचे सांगून बालवयातच स्थूलता निवारण करण्यावर भर देण्याविषयी मत व्यक्त केले. ते फिलाडेल्फिया येथील बालकांच्या इस्पितळातील या विषयाचे तज्ज्ञ आहेत.

गुटगुटीत व सुदृढ बालक दिसायला चांगले वाटले तरी गुटगुटीतपणा व सुदृढपणा याचा अर्थ स्थूलता नाही. हे या संशोधनाने अधोरेखित केले आहे. आपल्याकडील नवश्रीमंत वा श्रीमंत वर्गात अशा प्रकारची स्थूल बालके आढळतात. तर दुसरीकडे कुपोषणग्रस्त बालकांचा प्रश्न शैशवावस्थेसमोरील अव्हान आहे.

**संदर्भ** - 'सायन्स' खंड क्र. ३३१, ७ जानेवारी २०११ पृ. १३

## रीचर्ड बिंग

वैद्यकीय संशोधन व संगीत रचना या दोहोंची विलक्षण आवड असणाऱ्या रिचर्ड बिंग यांचे ८ नोव्हेंबर २०१० रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९०९ रोजी जर्मनीत झाला होता.

या दोन क्षेत्रांचा प्रत्यक्षात काही संबंध नाही. मात्र त्यांनी त्यांच्यावर बनवण्यात आलेल्या 'पाराम्युरा' या माहिती पटात असे उद्‌गार काढले आहेत की, ''वैद्यकीय संशोधन व संगीत या दोहोंत समान असणारी बाब म्हणजे नवनिर्मिती क्षमतेला असणारा वाव ही होय! मायक्रोसॉफ्ट ने केलेल्या साहाय्यातून बनवण्यात आलेला माहितीपट गतवर्षीच्या सनडान्स फिल्म फेस्टिव्हल मध्ये दाखवण्यात आला होता. ''निर्माण करण्याची इच्छा म्हणजे अदृश्य अशा वास्तवातून काहीतरी पाहण्याची इच्छा'' असे त्यांनी सांगितले.

हृदयविकार तज्ज्ञ असणाऱ्या बिंग यांना श्रद्धांजली वाहणारा मुक लेख 'बीएमजे' च्या १५ जानेवारी २०११ च्या अंकात आहे. तसेच bmj.com या संकेतस्थळावर आधिक माहिती आहे. त्यांचे जुने स्नेही रॉबर्ट गोल्डवर्ब यांनी असे सांगितले की, 'संगीत आणि वैद्यकीय संशोधन हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग होते. जगण्यासाठी या दोहोंचा त्यांना आधार वाटे.

'टॉसिग - बिंग सिण्ड्रोम' हा वैद्यकशास्त्रात मान्यता प्राप्त असा लक्षणसमूह आहे. हृदयासंदर्भातील २० प्रकारच्या अनियमित कार्यप्रणालीवर त्यांनी संशोधन केले होते. या विषयावरील पहिली प्रयोगशाळा अमेरिकेत त्यांनी निर्माण केली. (Cardiac Cathetrisation Laboratoy)

हृद्रोगावर संगीताचा किती प्रभावी उपचार होऊ शकतो यावर त्यांनी चिंतन केले होते त्यांच्या ३०० संगीतरचना व ५०० संशोधन निबंध प्रसिद्ध आहेत.

**संदर्भ** - BMJ - 342: 115-178 W. 7789 ISSN 1759 - 2151 15 Jan 2011 पृ. १७९

# 'विजय तेंडुलकर' एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

*मराठीतील ख्यातनाम लेखक कै. विजय तेंडुलकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा हा लेख - संपादक*

विजय धोंडोपंत तेंडुलकर यांचा जन्म '१९२८' मध्ये मुंबईत एका मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये झाला. अखिल भारतीय रंगभूमीला आंतरराष्ट्रीय पातळीवर कीर्ती मिळवून देणारे नाटककार, पट-कथाकार व चतुरस्त्र लेखक, संपादक विजय तेंडुलकर यांनी कथा, एकांकिका, ललित निबंध, कादंबरी, नाटक, बालवाङ्मय व काही पुस्तकांचे मराठी अनुवाद इत्यादी विविध वाङ्मयप्रकारांत गेली पन्नासहून अधिक वर्षे विपुल प्रमाणात लेखन केले.

विजय तेंडुलकरांनी मराठी साहित्यामध्ये खूपच मोठे योगदान दिलेले आहे; त्यांनी 'गिधाडे', 'बेबी', 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाइंडर', 'कन्यादान' 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'मी जिंकलो! मी हरलो!', 'घरटे अमुचे छान', 'एक हट्टी मुलगी', यासारखी सुमारे ३० नाटके लिहिली. 'अंधेरनगरी', 'अजगर आणि गंधर्व', 'भेकड आणि एकांकिका', 'रात्र आणि इतर एकांकिका',या एकांकिकाही लिहिल्या. मुलांसाठी 'इथे बाळं मिळतात', 'चिमणा बांधतो बंगला', 'पाटलाच्या पोरीचं लगीन' यासारखे बालवाङ्मय लिहिले. 'आधे अधुरे', 'तुघलक', 'वासनाचक्र', या पुस्तकांचे अनुवादही केले. 'रातराणी', 'कोवळी उन्हे', हे ललित गद्यही लिहिले.

तेंडुलकर हे उत्तम छायाचित्रकार होते. गप्पा मारणारे; सिनेमा पाहणारे; नवीन नाटककारांच्या नाटकांना दाद देणारे; विनोद करणारे; विनोदाला हसणारे; आयसीयूतही लॅपटॉपवर काम करणारे असा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा हा साहित्यिक ज्या सहजतेने कोणताही बडेजाव न ठेवता; कुणाचाही तमा न बाळगता; स्वत:च्या मतांचा आग्रह न धरता; उपदेश न करता दीन-दुर्बळांचे अश्रू पुसण्यासाठी अहोरात्र अनेक चळवळींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला.

१९८२ साली वेठबिगार मुक्तीच्या लढ्यात तेंडुलकर होते; गुरुदेव सिद्धपीठ आश्रमाच्या लढ्यात उत्साहाने सहभागी होऊन त्यांनी अटकही करवून घेतली. सामाजिक क्षेत्रातील धोरणात्मक बाबींवर धोरणकर्त्यांसोबत कराव्या लागणाऱ्या कामाचे कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याने १९९२ च्या दरम्यान 'नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज' ची स्थापना केली; यात तेंडुलकरांनी उपाध्यक्ष पदाची धुरा सांभाळून संस्थेचे नेतृत्व केले.

समर्थ साहित्यिकाचंच नव्हे तर समर्थ समाजप्रबोधकाचं लक्षण त्यांच्यात होतं. तेंडुलकरांचा पिंडच चिकित्सकाचा; त्यांच्या सहज सलगीच्या बोलण्यातही चिकित्सा असायचीच; आपल्या 'खोली' त व तंद्रीत असल्यागत, तरी परखड भाष्य करीतच संवाद पुढे नेण्याची त्यांची हातोटीच. अगदी सत्ताधीशांच्या मूल्य घसरणीपासून ते नर्मदेच्या निर्णय प्रक्रियेपर्यंत त्यांचं मत असायचं आणि ते नेमकं गरिबांच्या; पीडितांच्या बाजूचं. समाज जीवनावर; त्यातल्या विविध प्रवाहांवर, लोकांबद्दल, विनोदाबद्दल ते जास्त बोलायचे.

परदेशांत आणि आपल्याकडे तयार होणारे अनुबोधपट; कलावंतांची आत्मचरित्रे, इंग्रजी, हिंदी व मराठी चित्रपट जनसंपर्क माध्यमांत झालेली क्रांती आणि पत्रकारितेचे बदलत गेलेले स्वरुप अशा कितीतरी गोष्टींवर तेंडुलकर अगदी सहजपणे मार्मिक अभिप्राय प्रकट करत;

यामधून त्यांच्या अद्ययावत ज्ञानाचा आणि मर्मदृष्टीचा प्रत्यय येत असे.

गुणवान आणि कसदार साहित्यनिर्मिती करूनही दुर्लक्षिल्या गेलेल्या अयशस्वी माणसांशी गाठ पडली तर त्यांची निगराणी ते जाणीवपूर्वक करीत, एखादा तरुण लेखक, रंगकर्मी आत्मविष्काराच्या वेगळ्या वाटा शोधतो आहे हे जाणवले, त्यामगचा त्याचा सच्चेपणा, अस्सलपणा मनाला भिडला तर त्याच्यासाठी काय वाटेल ते करायची तेंडुलकरांची तयारी असे. भल्या-बुऱ्या अनुभवाचा अक्षरश: साठा त्यांच्याकडे असूनही स्वत:विषयी बोलायला ते कधीही उत्सुक नसत; त्यामुळे तेंडुलकरांच्या 'बोलण्या' पेक्षा त्यांचे ऐकणे च अधिक प्रसिद्ध होते.

'सिटीझन फॉर जस्टिस' या संस्थेचे तेंडुलकर अध्यक्ष होते; तेंडुलकर हे एकीकडे आदर्श लोकशाहीवादी होते आणि त्याचबरोबर स्वतंत्रपणे विचार करणारे विचारवंत होते. लोकशाहीतील विरोधी, वेगळं, बंडखोर मत असण्याचं आणि मांडण्याचं जे स्वातंत्र्य असतं, त्या स्वातंत्र्याची त्यांची बांधीलकी होती; ही त्यांची वृत्ती त्यांना अनेक नवनव्या गोष्टीकडे घेऊन गेली. पण या त्यांच्या वृत्तीला अचूक नेमकेपणाची साथ होती.

तेंडुलकरांच्या नाटकांचा थोडक्यात उल्लेख करायचा झालाच तर 'अशी पाखरे येती' हे भावरम्य नाटक त्यांनी लिहिले. 'गिधाडे' नाटकातील पाटमोऱ्या रमाच्या साडीवर दिसणाऱ्या रक्ताच्या लाल डागाने तेव्हा निर्माण झालेले वादळ, मग निळ्या रंगाच्या डागावर रंगभूमी परिनिरीक्षण मंडळीने केलेली तडजोड विशेष गाजली. 'सखाराम बाइंडर' नाटकाचा विचार करायचाच झाल्यास या नाटकामध्ये हिंसेचे उग्रभीषण स्वरूप; ते नाटक वाचतानाही एखाद्या क्रूर श्वापदासारखे अंगावर चाल करून येते.

'गिधाडे', 'बेबी', 'घाशीराम कोतवाल', 'सखाराम बाइंडर', 'कन्यादान' मधून 'माणूस सोलवटून काढणारं क्रौर्य' तेंडुलकरांनी मांडलं आहे. 'घाशीराम कोतवाल' आणि 'सखाराम बाइंडर' वर टीका करण्याचे त्यांच्या घरी धमक्याचे फोन यायचे. काही मराठी साहित्यिकांनीही तेंडुकरांविरुद्ध मोहीम उघडलेली होती; तसे तेंडुलकरांचे 'राग-लोभ' ही विलक्षण तीव्र होते.

तेंडुलकरांचे ललित लेखही खूप खळबळ माजवणारे ठरले. 'मुस्लीम आणि मी ' या ललित लेखात 'हिंदू' मनांवर मुस्लिमांबद्दलच्या द्वषाचे संस्कार लहानपणीच कसे बिंबवले जातात, 'मुस्लीम' हा शब्द उच्चारताक्षणी आपल्या मनात कोणत्या प्रकारची माणसं उभी राहतात? असंस्कृत, अशिक्षित, अर्धवट, विकृतींनी ज्यांची मने पूर्णपणे बरबटून गेलेली आहेत अशी, हिंसेसाठी सदैव उत्सुक असणारी. थोडक्यात म्हणजे, एवढ्या तेवढ्या निमित्तानं पिसाट आणि बेभान होणारी माणसं म्हणजे 'मुस्लीम!' ही व्याख्याच जणू हिंदू मनांवर बिंबविली जाते याचा स्पष्ट उल्लेखही ते आपल्या लेखात करतात.

ज्याचा साधा उच्चार करायलाही आपण बिचकतो; जे क्षणोक्षणी पाहतो ते दिसलेच नाही असे भासवतो ते तेंडुलकर बिनदिक्कत सांगत होते; किंबहुना ते सांगण्याच्या; वास्तवदर्शन घडविण्याच्या उत्कट इच्छेतूनच त्यांनी नाटके; एकांकिका व ललित लेखनही केले. 'माझ्या सगळ्या नाटकांची नावं पुसून टाकलीत तर हरकत नाही, पण त्यातनं मी जे काही सांगण्याचा प्रयत्न केला ते पुसू नका' असं ते म्हणत.

तेंडुलकरांची नाटके, ललित लेख एकूणच त्यांचं सर्व लेखन हे खळबळ माजवून देणारं असल्यामुळे 'संस्कारक्षम' वयातील मुलामुलींनी तेंडुलकरांची नाटके पाहणे, त्यांच्या नाटकांची कल्पना करणे सहज शक्य होते.

वृत्तीगांभीर्याने जगणे आणि तसे जगताना आलेले अनुभव व्यावहारिक यशापयशाची पर्वा न करता परिणामकारक रीतीने मांडणे, ही दिशा तेंडुलकरांनी नाटक

असो वा चित्रपटांचे पटकथा-संवादलेखन असो, कधीही बदलली नाही. कायमस्वरूपी नोकरी नसल्याने पैशाची चणचण बऱ्याचदा भेडसावत असली तरी भलत्याच मार्गाला ते लागले नाहीत, तर प्रलोभनांना त्यांनी सहजपणे दूर लोटले. समकालीन लेखकांच्या व समीक्षकांच्या वर्तुळातही तेंडुलकरांचा कधीच संचार नव्हता.

तेंडुलकरांना सुषमा, प्रिया, तनुजा, राजा ही चार मुलं होती. तेंडुलकरांनी स्वत:च्या मुलांना कोणतंही वळण आग्रहानं लावलं नाही; तुमच्या आयुष्याच्या दिशा मी माझ्या अधिकारात ठरवल्या नाहीत, अनुभवातून शहाणपन शिकवण्याचा एकमेव पर्याय तुमच्यासाठी ठेवताना मी माझ्या जबाबदाऱ्या टाळल्या तर नाही ना? असे प्रश्न ते आपल्या मुलीला वाढदिवशी लिहिलेल्या पत्रात करताना दिसून येतात.

विजय तेंडुलकर हे सातत्याने इतरांचा म्हणजे कुटुंबियांपासून ते समाजापर्यंतचा विचार करताना ते दिसून येत. कितीतरी कौटुंबिक धक्के त्यांनी सोसले; पत्नी निर्मला, मुलगी प्रिया, मुलगा राज सकट साऱ्यांना हरवून ते काहीसे हतबलही झाले; तरीही त्यांचं एकटेपण घेऊन साहित्याश्रमात त्यांनी अफाट कामगिरी केली.

मॅट्रिक होण्याच्या आतच तेंडुलकरांनी शाळा सोडली होती; औपचारिक शिक्षणाला महत्व असण्याच्या काळात जगताना तेंडुलकरांना हे अर्धवट शिक्षण किती आड आलं असेल? पण औपचारिक शिक्षण सोडलं तरी त्यांनी 'शिक्षण' सोडलं नाही; अप्रतिम इंग्रजी कमावलं; सतत नव्याच्या शोधाने ते 'अनौपचारिक' शिक्षण घेत राहिले; म्हणूनच औपचारिक शिक्षण पूर्ण केलेल्या, साहित्यक्षेत्रात नावाजलेल्या साहित्यिकांना लाजवील अशी अफाट साहित्य निर्मिती त्यांनी केली.

नव्याने लिहिणाऱ्या साहित्यिकांना तेंडुलकर हे जवळचे आणि हक्काचे वाटत व तेंडुलकरही नि:स्वार्थ हेतूने त्यांना मार्गदर्शन करत. त्यामुळे तेंडुलकर हे अट्टाहासाने तरुण पिढीत मिसळतात आणि त्यांचं नको इतकं कौतुक करतात, असा आरोप होतो. वेळेवेळी तेंडुलकर जे विचार व्यक्त करीत ते उत्स्फूर्त, भावनात्मक प्रतिक्रियेच्या स्वरूपात असत; पण बौद्धिकदृष्ट्या पारखून घेतलेली; तर्कशुद्ध युक्तिवादातून सिद्ध झालेली भूमिका त्यामागे आहे असे मानल्याने तेंडुलकरांची विधाने व अभिप्राय विवाद्य ठरत.

दरदिवशी काही ना काहीतरी लिहिल्याशिवाय न झोपणारा हा साहित्यिक, 'दिग्दर्शक, नेपथ्यकार, रंगमंचव्यवस्था करणाऱ्यांना' रंगभूमीवर उभा करायलाही कमालीचा अवघड असायचा. समाजात घडणाऱ्या गोष्टींबाबत तेंडुलकर हे सदैव उत्सुक असायचे; ते अत्यंत वरच्या दर्जाचे समाजशास्त्रज्ञ होते; निरीक्षण करणारे; नोंदी करणारे आणि अनुमान काढणारे; संभाषणात ते अफलातून विनोदी बोलत असत, ज्या विनोदात उपरोध आहे, असा विनोद त्यांना विशेष आवडायचा.

व्यंगचित्रकार, समाजसेवक, नवनाटककार छायाचित्रकार, यांच्याशी त्यांची विशेष जवळिक असायची. लेखन, चित्रपट, व्यंगचित्रकला अशा सर्जनशील क्षेत्रांत त्यांचं लक्ष वेधून घेणारं, त्यांना आवडणारं असं कुणी काही केलं की त्यांच्यापर्यंत आपण पोहोचलं पाहिजे, दाद दिली पाहिजे ही त्यांची आंतरिक उर्मी होती.

तेंडुलकरांची शोकांतिका ही की त्यांना ज्यांनी जन्मभर विरोध केला; त्यांच्या मते, ज्यांनी जगाला जिवंत नरक बनवून टाकलं, त्याच नरकात डुबक्या मारत बसलेली भंपक मिडिऑकर माणसं, त्यांना आयुष्यभर सतत सहन करावी लागली, सोसावी लागली. सर्वार्थाने 'साहसी' म्हणता येईल असा हा साहित्यिक पश्चिमेकडे जन्मला असता तर त्याचा उदो उदो त्यांच्याकडे (व आपल्याकडेही) झाला असता.

'विजय तेंडुलकर' हे भारतीय रंगभूमीच्या आधारस्तंभ होते. मुख्य म्हणजे पारंपारिक रंगभूमीचा चेहरा बदलणाऱ्या नामवंत भारतीय नाटककारांपैकी ते एक होते; म्हणूनच तर ते 'मिडिया आयकॉन' बनले. माध्यमांच्या दृष्टीने ते कायमच महत्त्वाचे राहिले. मराठी नाटककारांच्या परंपरेत तेंडुलकर हे उत्तम 'वाचक' होते. तेंडुलकरांची महाराष्ट्रभर, भारतभर आणि जगभर पसरत जाणारी नाट्य-प्रतिभा विशेष उल्लेखनीय होती.

साहित्यामध्ये असणाऱ्या निर्विवाद वर्चस्वामुळेच १९९३ साली 'ज्ञानपीठ पुरस्कारा' च्या तोडीचा 'राष्ट्रीय स्तरावर' देण्यात येणारा 'सरस्वती सन्मान' तेंडुलकरांच्या 'कन्यादान' नाट्यकृतीला जाहीर झाला. २००४ साली अमेरिकेत न्यूयॉर्क' च्या सुप्रतिष्ठित 'ऑफ ब्रॉडवे' थिएटरमध्ये 'द ग्रेटेस्ट प्लेराइट इन इंडियन लँग्वेजेस' असा तेंडुलकरांचा गौरव करण्यात आला. शिवाय त्यांच्या एकूणच अष्टपैलू साहित्यामुळे, त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वमुळे भारतातील प्रतिष्ठेचा असा 'पद्मविभूषण' हा पुरस्कारही मिळाला.

मिळालेला प्रत्येक पुरस्कार त्यांनी एका प्रकारच्या आत्मविश्वासाने, आधिकाराने स्वीकारला; कारण त्यायोगे मिळणाऱ्या पैशाची त्यांना नेहमीच गरज होती, हे जसे त्यांनी लपवून ठेवले नाही, तसे आवर्जून सांगितलेही नाही.

त्यांनी केलेली ही ऐतिहासिक कामगिरी सर्वश्रुत आहे. तेंडुलकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असले तरी या व्यक्तिमत्वातील साहित्यिकाचा पिंड हा सर्वश्रेष्ठ आहे; त्यामुळे तेंडुलकर हे आधी लेखक होते; त्यांनी लेखकाची प्रतिष्ठा आपल्या वागण्यानं वाढवली शिवाय अनेकांना परखड मत सुनावून मराठी रंगभूमीचे रक्षणही केले आहे.

विजय तेंडुलकर हे व्यक्तिमत्त्व शब्दांत पकडणं तसं खूपच कठीण, मराठीतलं खऱ्या अर्थानं आंतरराष्ट्रीय स्तरावर गेलेलं नाव; फक्त साहित्यातच नव्हे तर अनेक क्षेत्रांविषयी आस्था असणारं; उत्सुकता असणारं आणि जगण्यावर प्रचंड प्रेम करणारं समृद्ध व्यक्तिमत्त्व; काळाच्या ओघात दिनांक १९ मे २००८ रोजी हरपले; त्यांच्या जाण्याने मराठी साहित्य विश्वाचीच नव्हे तर संपूर्ण साहित्यविश्वाची, त्यांनी पादाक्रांत केलेल्या अनेक क्षेत्रांची व एका द्रष्ट्या योद्ध्याची झालेली उणीव कधीही भरुन येणार नाही.

**– श्री. नितीन सुरेश वेडगा, पालघर**

(सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या वार्षिकातून साभार)

## 'सहा' चे महत्त्व

**१) सहा शास्त्र:**

(१) सांख्य, (२) पातांजल, (३) न्याय, (४) वैश्विक, (५) पूर्वमीमांसा, (६) उत्तरमीमांसा.

**२) सहा प्रकारची कर्म:**

(१) नित्य, (२) नैमित्तिक, (३) काम्य, (४) प्रायश्चित, (५) सकाम, (६) निषेधकर्म.

**३) सहा शत्रु :**

काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर.

**४) सहा ऋतू :**

वसंत, ग्रीष्म, वर्षा, हेमंत, शिशिर, शरद.

**५) सहा लिंग :**

उपक्रम, उपपत्ती, अपूर्वता, अर्थवाद, अभ्यास, उपसंहार

**६) सहा अक्षरी मंत्र :** रामकृष्णहरी

**७) सहा गोष्टी हातात नाहीत :**

लाभ, हानी, जीवन, मरण, यश, अपयश.

– संग्रहातून

# गीतारहस्य

*लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्य या ग्रंथाचा परिचय करुन देणारा लेख - संपादक*

आपणा सर्वांना लोकमान्य टिळकांनी लिहिलेला श्रीमद् भगवद् गीतेवरील 'गीतारहस्य' हा टीका ग्रंथ माहीत आहे. आज माझ्यासमोर या ग्रंथाची १९६८ सालची ९वी आवृत्ती आहे. मूल्य १६ रुपये आहे. ९०० पानांच्या ग्रंथाचे याचे नाव -

The Hindu Philosophy of Life, Ethics and Religion

ॐ तत्सत ।

श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र

असे पुस्तकावर आहे. गीतेचे बहिरंग परीक्षण, मूळ संस्कृत श्लोक, मराठी भाषांतर, अर्थ निर्णायक टीपा, पौर्वात्य व पाश्चिमात्य मतांची तुलना वगैरेंसह हा ग्रंथ आहे. प्रकाशक ज. श्री. टिळक (टिळक बंधु) यांनी हा केसरी मुद्रणालयातून ५६८ नारायण पेठ, पुणे २ येथून प्रकाशित केलाय. टिकाऊ कापडी बांधणी, सप्तरंगी, चित्रकार श्री. दलालांचे कुरुक्षेत्राच्या रणभूमीचे चित्र असलेले वेष्टन व मागे लोकमान्यांचे छायाचित्र असे या ग्रंथाचे बाह्यस्वरुप आहे.

बाबू अरविंद घोष व महात्मा गांधी यांचे अभिप्राय अगदी सुरुवातीलाच आहेत. नंतर नव्या आवृत्तीची प्रकाशकांची प्रस्तावना आहे. त्यात ते म्हणतात ''संसारिक कर्मे गौण मानून समाजाकडे पाठमोरा होईल तो ज्ञानी, हा विचार समाजात प्रबळ होऊ लागला, तेव्हा समाजाच्या धारणेसाठी त्याचे खंडन करणे, '' ज्ञानी माणसाला तर कर्म सोडताच येत नाही '' हे अधिकार वाणीने सांगणे आवश्यक होते; ही विचाराची मात्रा गीता रहस्याने दिली व हिंदू समाजाला एक प्रकारे संजीवन दिले. गीतारहस्याच्या निमित्ताने लोकमान्यांनी आत्मचरित्र लिहिले. खऱ्या कर्मयोग्याचे जीवन ते जगले. गीता ही निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे किंबहुना गीतेत 'योग' हा एकेरी शब्दच 'कर्मयोग' या अर्थी योजलेला आहे. हा बोध त्यांना गीतेवरील अनेक प्राकृत, संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केल्यानंतरही मूळ गीताच अभ्यासल्यावर झाला व गीतेतील प्रतिपाद्य विषय प्रवृत्तिपर आहे हे मत कायम होऊन त्यावर लिहावे हे मनात ठरवूनही १९१० साली मंडालेच्या तुरुंगात त्यांना लिहिण्यास त्यांच्या देशकार्यातून सवड मिळाली. व १६ व्या वर्षी प्रथम आजारी वडिलांना गीतेवरील प्राकृत टीका वाचून दाखवण्याच्या निमित्ताने गीतेची गोडी लागून तिचा अभ्यास घडला व त्यावर 'गीतारहस्य' हा ग्रंथराज निर्माण झाला. १९१४ ला टिळकांची सुटका झाली मंडालेच्या तुरुंगातून. पण गीतारहस्याच्या हस्तलिखित वह्या सरकाकडून लवकर परत मिळण्याचे चिन्ह दिसेना. (कारण त्यांचे सर्व सामानसुमान तुरुंग सोडण्यापूर्वी त्यांनी तुरुंग अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले होते) 'सरकारचा वह्या परत करण्याचा इरादा दिसत नाही' असे काही जणांनी स्पष्ट बोलून दाखवले त्यावेळी ''भिण्याचे कारण नाही. वह्या सरकारी कब्जात असल्या तरी ग्रंथ माझ्या डोक्यात आहे. फुरसतीच्या वेळी सिंहगडावर बसून पुन्हा लिहून काढीन.'' ही आत्मविश्वासाची तेजस्वी भाषा उतारवयातील वयोवृद्ध टिळकांची आहे. आणि ग्रंथही किरकोळ नसून गहन अशा तत्वज्ञानाचा ९०० पृष्ठांचा आहे. यावरुन लोकमान्यांच्या प्रवतिपर प्रयत्नवादाची यथार्थ कल्पना येते. सुदैवाने वह्या मिळाल्या नि लवकरच लोकमान्यांनीच त्याच्या तीन आवृत्या काढल्या.

वैदिक धर्मातील राजगृहाचा हा परीस पुढील पिढीतील लोकास देण्यासाठीच आम्हांस प्राप्त झाला आहे. ''उत्तिष्ठत! जाग्रत! प्राप्य वयान्निबोधत!'' उठा! जागे व्हा! आणि (भगवंतानी दिलेले) हे वर समजून घ्या!'' कठोपनिषदातील हे मंत्र स्वामी विवेकानंद पण तरुणांना जागृत करण्यासाठी सांगत. यात कर्माकर्माचे सर्व बीज आहे. निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीने संसार करून थकल्या भाकल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनही गीता सांगितलेली नसून, संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पाहिजे व मनुष्य मात्राचे खरे कर्तव्य काय, याचा तात्त्विक दृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीता शास्त्राची प्रवृत्ती झालेली आहे म्हणून, पूर्ववयातच गृहस्थाश्रमाचे किंवा संसाराचे हे प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणे शक्य असेल तितक्या लवकर समजून घेतल्या खेरीज राहू नये, एवढीच आमची शेवटी विनंती आहे. असे लोकमान्यांनी प्रस्तावनेच्या अखेरीस म्हटले आहे, कळकळीने तरुणांना विनवले आहे.

त्यानंतर गीता रहस्यातील विषयांची प्रकरणश: अनुक्रमणिका दिलेली आहे. मंडाले तरुंगात लिहिलेल्या गीतारहस्याच्या मूळ हस्तलिखित प्रतीतील पहिल्या वहीचे पहिले पान याचा फोटो पण दिलेला आहे. व त्यानंतर गीता रहस्याच्या पहिल्या प्रकरणाला सुरुवात झालेली आहे.

गीता रहस्यांतील विषयांची प्रकरणश: अनुक्रमणिका द्यायच्या आधी वर गीतारहस्याची सामान्य अनुक्रमणिका दिलेली आहे. यात -

गीता रहस्यांतील विषयांची प्रकरणश: अनुक्रमणिका ... २०-२८
संक्षिप्त चिन्हांचा खुलासा वगैरे ... २९-२८
गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र ... २९-३९
गीतेचे बहिरंग परिक्षण ... १-४६७
गीतेच्या भाषांतराचा उपोद्घात ... ५४७-८०५
गीतेच्या अध्यायांतील विषयांची श्लोकवार अनुक्रमणिका ... ५४९ - ५५६
श्रीमद्भगवद्गीता - मूळ श्लोक, मराठी भाषांतर व टीपा... ५५७ - ८०५
गीतेतील श्लोकांची सूची ... ८०६ - ८१६
ग्रंथांची व व्यक्तींची सूची, हिंदूधर्म ग्रंथाची सामान्य माहिती आणि गीता रहस्याच्या मूळ हस्तलिखित पोथीची माहिती ... ८१७ व पुढे

यानंतर गीतारहस्यकारांची जन्मकुंडली व राशिकुंडली तथा जन्मकालीन स्पष्ट ग्रह दिलेले आहेत. पुढच्याच पानावर लोकमान्याचे छायाचित्र आहे. जन्म २३ जुलै १८५६ व मृत्यू १ ऑगस्ट १९२०

गीतारहस्यातले विवेचन लोकांस आधिक सुगम व्हावे म्हणून टिळकांनी १९१४ सालच्या गणेशोत्सवात चार व्याख्याने दिली. त्यांतून त्यांनी पारतंत्र्यात खितपत पडलेल्या जनतेचा स्वदेशाभिमान जागृत केला. ज्ञान व कर्म हे दोन पंख आहेत. पंखांनी उडायचे आहे. कारण ज्ञानाविना कर्म आंधळ आहे नि कर्माविना ज्ञान पांगळं आहे. ज्ञान हे कर्माचे शिखर आहे तर कर्म हा ज्ञानाचा पाया आहे. त्यामुळे ह्या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत आणि त्याही लवकर मिळवणं हे तरुणांच्या मनावर हृदयावर ठसवलं, बिंबवलं, कोरलं. नंतर ग्रंथ छापून १९१५ ला त्याचा पूर्णावतार झाला. मंडालेच्या तुरुंगात अनंत अडचणी व त्रास सहन करूनही त्यास भीक न घालता १९१० ला त्यांनी हस्तलिखित प्रत (शिसपेन्सिलीने लिहिलेल्या वह्या) तयार केली.

गीतारहस्याच्या मराठीत ९ आवृत्या (१९१५ते १९६८) हिंदीत १३ आवृत्या (१९१७ - ६५) गुजराथीत ३, बंगाली १, कानडी १, तेलुगू १, तामिळ १, इंग्रजी २ अशा आवृत्या निघाल्या आहेत. गीता रहस्या खेरीज त्यांचे इतरही ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

विविध रूपात मागे घेतलेला अनुभव आठवणे म्हणजे प्रत्यावाहन होय.

१) The Orion (ओरायन) वेदकालनिर्णय १८९३ ४ आवृत्त्या

२) The Arctic Home in the vedas 1903 आर्यांचे मूळ वसतिस्थान ३ आवृत्त्या

३) Vedic Chronology & Vedanga Jyotish 1925

**वेदांचा कालनिर्णय व वेदांग ज्योतिष**

गीतेसंबंधीच्या व्यासंगातून ही पुस्तके निर्माण झाली. वेदांच्या महोदधीत उडी मारून 'ओरायन' हे रत्न जनतेच्या स्वाधीन केले आणि वेदसागराचे पर्यटन करीत असता 'आर्यांचे मूळ वसतिस्थान' शोधून काढले. कालानुक्रमे गीता रहस्य ग्रंथ शेवटचा असला तरी महत्वाच्या दृष्टीने त्यालाच, वरील दोन पुस्तकांचा पूर्ववृत्तान्त पाहता, आद्यस्थान द्यावे लागते.

"गीता ग्रंथावरील टिळकांची टीका ही केवळ मल्लिनाथी नसून, स्वतंत्र प्रबंध आहे व त्यात नैतिक सत्याचे योग्य निदर्शन आहे. मराठीतील पहिल्या प्रतीचा हा पहिला प्रचंड गद्य ग्रंथ आपल्या सूक्ष्म व व्यापक प्रणालीने व सफाईदार प्रभावी लेखनशैलीमुळे अभिजात वाङ्मयात समाविष्ट होतो. बाबू अरविंद घोषांचे हे गीतारहस्याबद्दलचे उद्‌गार आहेत.

"कै. लोकमान्य टिळकांना आपल्या अभ्यास व विद्वता यांच्या ज्ञानसागरातून गीता प्रसादामुळेच हे दिव्य टीका मौक्तिक मिळाले. गीतेवरील टिळकांची टीका हीच त्यांचे शाश्वत स्मारक आहे" - महात्मा गांधी

अशा या गीतारहस्याचा आस्वाद प्रत्येकानेच घ्यायला हवा व गीतारहस्य जाणून घ्यायला व आत्मसात करायला हवे.

गीतारहस्य - बाळ गंगाधर टिळक

आवृत्ती ९ वी मूल्य १६ रुपये प्रकाशक - ज. श्री टिळक, केसरी मुद्रणालय ५६८ नारायणपेठ पुणे २

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

**थोडक्यात बोला**

'अति बोलणारी माणसं कुणालाही आवडत नाहीत. अति बोलण्यामुळे जे बोलायला नको असतं, तेही बोलून जातात. नंतर पश्चाताप होतो आणि माफी मागायची पाळी येते. त्यामुळेच मितभाषी माणसं आपुलकीस पात्र ठरतात. 'पाल्हाळ लावून बोलणे. असंबंद्ध बोलणाऱ्याला वाईट वाटू नये म्हणूनच ते ऐकून घेत असतात. योग्य शब्दांबाबत जागरूक असायलाच हवं. शब्दांना शब्दब्रह्म म्हणतात ते उगीच नव्हे. शब्दांचे अफाट सामर्थ्य ओळखून जर संवाद साधला तर ते आपलेही सामर्थ्य नक्कीच वाढवतात. शब्दांनीच निराश माणसाला हुरूप देता येतो तर अशांत माणसाला शांती. मात्र पाल्हाळ न लावता. एस. टी. च्या चौकशी कक्षात म्हणूनच लिहिलेलं असतं, कृपया आपले म्हणणे थोडक्यात सांगा.

- संग्रहातून

# स्पंदने युवा मनाची...

*ठाण्याच्या साहित्य संमेलनातील विद्यार्थी संमेलनात प्रा. दामोदर मोरे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्याचा संपादित भाग- संपादक*

८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातर्गत ठाणे येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नगरीत साहित्य सूर्य नारायण सुर्वे सभा मंडपात भरलेल्या पहिल्या महाविद्यालयीन विद्यार्थी राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या सन्माननीय उद्घाटक अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. सौ. उषा तांबे, रसिकांची मने जिंकणारे ख्यातनाम गीतकार स्वानंद किरकिरे, मराठीचे अस्तित्व आणि अस्मिता यांची संगीत पताका मना-मनात फडकवणारे संगीतकार माननीय कौशल इनामदार, ज्यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन प्रथमत: लोकाभिमुख केले ते साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष पा.के. दातार, सल्लागार मा. य. गोखले, संयोजक दा. कृ. सोमण, निमंत्रक प्रा. नरेंद्र पाठक, कार्यवाह विद्याधर ठाणेकर, सहकार्यवाह विद्याधर वालावलकर, कोषाध्यक्ष संजीव ब्रह्मे यांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. आणि ज्यांच्यासाठी हे संमेलन आयोजित केलेले आहे. जे महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून आणि गोव्यातूनही मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी आलेत त्या सर्व विद्यार्थिनी आणि विद्यार्थी मित्रांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.



**दीपप्रज्वलन करताना प्रा. दामोदर मोरे रंगमंचावरील मान्यवरांसह**

ही सुंदर मातृभूमी सुजलाम-सुफलाम करण्यासाठी उद्याची सरिता होऊ पाहणाऱ्या आजच्या झुळझुळत्या झऱ्यांनो, हे राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन काळाच्या, कातळावर तुमच्या सृजनाची सुंदर - सुंदर लेणी खोदण्यास संधी देणारे संमेलन आहे. साहित्याच्या सौंदर्यशाली दिमाखदार दरबारात साहित्यिकपणाचं भरजरी महावस्त्र तुम्हांला परिधान करणारं हे संमेलन आहे. तुमच्या अंतरंगाच्या आरशात तुमच्याच व्यक्तित्वाचे उत्खनन करायला लावणारे हे संमेलन आहे. युवा मनाची जी स्पंदने आहेत त्याबाबत थेट समाज मनाशी संवाद साधण्यास संधी देणारं हे संमेलन आहे.

विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या मनाच्या तरुण आणि सुंदर वेलीवर ज्या सृजनाच्या कळ्या फुलतात त्यांना समाजमनात दरवळण्यास संधी देणारं हे संमेलन आहे. या संमेलनाला उत्साहाचा, उर्मीचा, उर्जेचा झेंडा घेऊन तुम्ही आलात, तुमच्या उसळत्या 'उत्साहाचे', तुमच्यातील सृजन गंधाचे विद्यार्थी साहित्य संमेलनाचा प्रमुख म्हणून मी मन:पूर्वक स्वागत करतो. अशा या ऐतिहासिक विद्यार्थी साहित्य संमेलनाच्या प्रमुखपदी माझ्या सारख्या मराठी-हिंदीतून लिहिणाऱ्या लेखकाला संधी देऊन जो माझ्यावर विश्वास टाकला त्याबद्दल संयोजकां प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

नकारात्मक विचार मनात आणले तर आत्मविश्वास डळमळतो.

या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आम्ही विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. त्या स्पर्धांना महाराष्ट्रासह गोव्यातूनही उत्तम प्रतिसाद मिळाला याचा मला अत्यंत आनंद झाला. आलेलं सर्व साहित्य मी वाचलं. महाराष्ट्रातील आणि गोव्यातील विद्यार्थी काय विचार करतो आहे? त्याची भावस्पंदने कोणती आहेत हे लक्षात आलं हा विद्यार्थी चित्रवाहिन्यांच्या रंजनात वहात जाणारा नाही किंवा स्वान्त सुखाय अशीही त्याची वृत्ती नाही समाजाच्या समस्याची ठणक त्याला लागली आहे हे मला जाणवलं. या विद्यार्थी साहित्यिकांनी सामाजिक विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. काहींनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

समाजात काहींनी विचार करणंच सोडून दिलं आहे. पण विद्यार्थी समाजाच्या समस्याचा विचार करतात. त्यांच्या मनाला प्रश्न पडतात हे मला आशावादी चित्र वाटतं. मी त्यालाच प्रबुद्ध विद्यार्थी मानतो, ज्याचं मन नेहमीच चिकित्सा आणि चिंतन या दोन किनाऱ्यांमध्ये नितळ झऱ्या सारखं झुळझुळत असत. प्रबुद्ध विद्यार्थी तोच ज्याच अनिष्ट परंपरेच्या डोहात डुचमळणाऱ्या समाजाकडे लक्ष जात आणि या समाजात जर जिवंतपणा आणायचा असेल तर त्याला प्रवाहित करण्याची प्रतिज्ञा करतो. मी त्यालाच प्रबुद्ध विद्यार्थी म्हणजे ज्याला-जाती - जातीचे गढूळ डोह आवडत नाहीत म्हणून तो निर्भय आणि निर्भीडपणे भेदाभेदांच्या भीतीवर क्रांतिकारी विचारांच्या घणाचे घाव घालत राहतो आणि डोहा - डोहांचा सागर करू पाहातो, समाज एकसंघ करू पहातो.

आपण लोकमान्यांची राजकीय परंपरा मोठ्या निष्ठेने चालवत आहोत, पण आगरकर - लोकहितवादी आणि फुले आंबेडकर यांच्या समाज परिवर्तन आणि समाज प्रबोधनाच्या परंपरेकडे आम्ही डोळेझाक केली आहे. समाज परिवर्तनाचे आणि प्रबोधनाचे आव्हान नव्या पिढीने स्वीकारले पाहिजे उद्याच्या परिवर्तनाचे तुम्ही शिल्पकार झालं पाहिजे. जो श्रीमंत तो प्रतिष्ठित, जो वरच्या जातीचा तो प्रतिष्ठित, गरीब आणि खालच्या जातीचे हीन ह्या प्रतिष्ठेच्या पारंपारिक फुटपट्ट्या बदलण्याचे आव्हान तुमच्या पुढे आहे. या देशातल्या श्रमकऱ्यांना जागा प्राप्त करून देण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. कवी केशवसुत एकोणिसाव्या शतकात म्हणाले होते की 'नरेची केला हीन किती नर' आज तुम्ही आम्ही एकविसाव्या शतकात आहोत आणि आजही भटक्या - विमुक्तांना घर न देता आम्ही भटकत ठेवलं आहे. आदिवासींना आणि गावकुसाबाहेरील उपेक्षितांना आम्ही आजही 'माणूस' म्हणून स्वीकारलं आहे का ? आम्हीच आमच्या डोळ्यावरचा आपण आपल्या जातीचा चष्मा काढून स्वत:ला पाहण्याची गरज आहे. यां घटकांच्या दैन्य दुःख दारिद्र्याकडे आणि आजही होत असलेल्या अपमानाकडे पाहिलं, त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराच्या बातम्या वाचल्या की 'नरेची केला हीन किती नर' या कवितेच्या ओळींचा प्रत्यय मला आजही येतो. आम्ही चंद्रावर जाऊ पाहतोय. पण तशी आमच्या मनाची उंची वाढली आहे का ? परिवर्तन निर्माण करण्याची धमक असलेल्या विद्यार्थ्यांनो, निर्भय आणि निर्भीडपणे असा समाज निर्माण करा की तुमच्यातीलच एखाद्या कवीने उद्या असं लिहिलं पाहिजे की, 'नरेची केला नर किती सुंदर'.

एकोणिसाव्या शतकात सावित्रिबाई फुले म्हणाल्या, 'सृष्टी सुंदर.... मनुष्य सुंदर' सावित्रीबाई मनुष्याला सुंदर म्हणतात पण आम्हांला उपेक्षित घटक कुरूप आणि असुंदर वाटतात. त्यांची कुरुपता ही समाजव्यवस्थेचीच देणगी आहे हे आम्ही विसरतो. त्यांच्याकडे आपआपल्या जातीच्या लाडक्या चष्म्यातूनच पाहतो. त्यांना माणूस म्हणून आम्ही स्वीकारले आहे का? आम्हांला घरात बांधलेला संडास चालतो. पण त्यात आम्हीच केलेली घाण साफ करणारा माणूस मात्र आम्हांला चालत नाही. अस्पृश्याने खोदलेल्या विहिरीतील पाणी आम्ही पितो पण नंतर त्याच विहिरी खोदणाऱ्या अस्पृश्याला तहान लागली

अप्रिय आठवणींमागे एक पुरी न झालेली इच्छा असते.

तर मात्र त्याला दुरून पाणी वाढतो. एखाद्या मातंग भगिनीने विणलेला झाडू आम्हांला चालतो. त्याची पूजाही करतो पण झाडू बनविणाऱ्या भगिनीचा स्पर्श मात्र आम्हांला चालत नाही. हा सामाजिक जीवनातला विसंवाद मानवतेची हानी करणारा आहे. माणुसकीची कोमल फुलं पायदळी तुडविणारा आहे.

केवळ स्वान्त सुखाय लिहू नका. या उपेक्षित घटकांसाठी स्वातंत्र्याची पहाट तुमच्या साहित्यातून होऊ द्या. समतेचा सुगंध तुमच्या कथा-कवितातून दरवळू द्या, बंधुतेचे झरे तुमच्या उक्ती कृती आणि साहित्यकृतीतून झुळझुळू द्या. खुज्या विचारांना गटारात फेका आणि गटार नव्हे तर सागर व्हा. या देशातल्या उपेक्षितांसाठी आपल्या मनाची बंद असलेली दारे आणि खिडक्या उघडा भारतीयत्वाचा एकच ओघ आम्हात सर्वांकरता वाहील यासाठी तुमच्या प्रतिभेला बहर येऊ द्या मातृभूमीवर प्रेम करणे म्हणजे देशभक्ती. मातृभूमीवर राहणाऱ्या सर्व घटकांवर सारखं प्रेम करणे म्हणजे राष्ट्रभक्ती. या देशभक्तीचा आणि राष्ट्रभक्तीचा दुधधरार्केश संगम तुमच्या साहित्याच्या सुमधूर आस्वादाने आनंदाचे डोही, आनंद तरंग अशी अवस्था रसिकाची झाली पाहिजे.

माझ्या समोर बसलेल्या मराठी समाज, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृतीच्या वारसदारांनो! तुमच्यातील उर्जस्वल उर्जेला तुम्ही जागवा. मातीचं सोनं करण्याची धमक आणि चमक तुमच्यात आहे. उद्याच्या भारताचे तुम्ही नवनिर्माते आहात. जग आजच्या भारताकडे 'तरुण भारत' म्हणून आशावादीपणे पहात आहे. तुमच्या व्यक्तित्वाला प्रज्ञेची पालवी आणि प्रतिभेचा पान्हा फुटू द्या. हे विद्यार्थी साहित्य संमेलम तुम्हां विद्यार्थ्यांच्या मनाच्या खाणीतले सृजनाचे सोने शोधणारे संमेलन आहे. हे संमेलन विद्यार्थ्यांसाठी स्वाती नक्षत्रासारखं महान आहे कारण ते विद्यार्थ्यांच्या मनाच्या चमकदार शिक्षणात मानवी मूल्यांचे मोती निर्माण करणारे आहे.

विद्यार्थी मित्र हो! ज्यांना उजेड नाकारण्यात आला होता त्यांच्यासाठी उजेड पाहिजे. ज्यांना जगण्याचा सुगंध नाकारण्यात आला, त्याच्या आयुष्यात मोगरा बनून तुम्ही दरवळत राहिल पाहिजे. मित्र हो! हे केव्हा शक्य आहे? सामाजिक बांधीलकी तुमच्या व्यक्तिमत्वात लोणच्या-सारखी मुरली पाहिजे आणि तिचा प्रत्यय साहित्य कृतीतून आला पाहिजे, तरच हे शक्य आहे.

माझ्या हिंदी कवितेत मी म्हटलय, सुगंधानं विसरायच नसतं की मी फुलांमुळे आहे. फुलांनी विसरायचे नसतं की मी फांदीमुळे आहे. फांदीने विसरायचं नसतं की मी खोडामुळे आहे. खोडाने विसरायचं नसतं की मी मातीमुळे आहे. माणूस असो की लेखक, त्याने विसरायचं नसतं की मी देशामुळे आहे, समाजामुळे आहे.

विद्यार्थी मित्र हो! तुम्ही तुमच्या साहित्य कृतीतून सामाजिक बांधीलकीचा झेंडा फडकवला पाहिजे. साहित्यकृतीतून ही बांधीलकी प्रकट होताना ती कृत्रिम आणि प्रचारी, उपरी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. मी मराठी आहे. मराठीचा मला अभिमान आहे. पण आपला अभिमान कुणालाही रुतू किंवा टोचू देता कामा नये.

मराठीपणा, मराठी कणा आणि मराठी बाणा तुमच्या कथा कवितेतून झुळझुळू द्या. मराठी माणूस म्हणून कर्तृत्वाच्या उंच उंच शिखरावर गरुड झेप घेण्याचं सामर्थ्य तुमच्या पंखांमध्ये आहे. यावर माझा विश्वास आहे. तुम्ही दैववादी बनू नका. दैववाद हा कर्तृत्वाला जखडून पांगळा बनवणारा आहे. दैववाद हा दैन्य, दारिद्रय आणि दुःखाच्या, निष्क्रियतेच्या दरीत ढकलणारा डायनासोर आहे. दैववादाच्या मोहक, मऊ पाऊलवाटेने तुम्ही जाऊ नका, ती काळोख्या दरीकडे जाते. पण प्रयत्नांची प्रकाशमान पाऊलवाट मात्र माणसाला तेजाच्या यशाच्या आणि सुखाच्या शिखराकडे घेऊन जात असते. हे नेहमी लक्षात ठेवा.

तुम्ही विचारवंत व्हा. पण नुसतेच विचारवंत होऊ

नका. आचारवंतही व्हा! तोंडाला कुलूप लावून बसणारे विचारवंत होऊ नका मानवता होरपळताना मौनीबाबाची भूमिका घेणारे पांगळे विचारवंत होऊ नका, अन्याय अत्याचाराच्या घटना घडत असताना ज्यांना त्या घटना दिसत नाहीत असे आंधळे विचारवंत आणि साहित्यिक तुम्ही होऊ नका. उपेक्षिताच्या वस्तीतील स्त्रियांवरील बलात्काराच्या किंकाळ्या ज्यांना ऐकायला येत नाहीत असे बधिर साहित्यिक आणि विचारवंत बनू नका. सत्ता मग ती कोणतीही आणि कोणत्याही क्षेत्रातील असो तिच्या दावणीचे बैल बनून झुलत राहू नका.

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, विद्यार्थ्यांनो! खुरटी झाडं होऊ नका उंचच उंच वृक्ष व्हा! त्याचसाठी हे संमेलन आहे. तुमचं व्यक्तिमत्त्व वृक्षासारखं विशाल झालं पाहिजे तुमच्या व्यक्तीमत्वाच्या सावलीत कुणालाही येऊन बसावेसे वाटले पाहिजे. डबे वाहून नेणारं रेल्वेचे इंजीन तुम्ही झाले पाहिजे. हे इंजिन हजारोंना सोबत घेऊन पुढे – पुढे जातं. तुमची प्रगती झाली. आपल्या गरीब बांधवांचं काय? मी जेवलो पण जे भुकेले आहेत त्यांचं काय? लेखक, विचारवंत म्हणून ही ठणक मला लागली पाहिजे आणि माझ्या वाणी आणि कृतीतून एका जातीला नव्हे तर संपूर्ण समाजाला पुढे नेण्यासाठी मी प्रयत्नशील असलं पाहिजे.

नव्या युगातील नव्या दमाच्या विद्यार्थ्यांनो! तुमच्यात मला केशवसुतांचा 'नवा शिपाई' पाहण्याची इच्छा निर्माण झाली आहे. लक्षात ठेवा, ब्राह्मण नाही, हिंदू ही नाही, न मी एक पंथाचा असा हा शिपाई आहे. ज्याचं मन आणि मनगट मजबूत असेल जो निर्भय आणि निर्भीड आहे. तोच आपल्या बळकट हातात हा ध्वज घेऊ शकतो. आणि तो हाती घेण्याची आज गरज आहे.

समाजाला ज्या – ज्या कोपऱ्यात अंधार आहे तेथे – तेथे मेणबत्ती होऊन तुम्ही जळालं पाहिजे. 'त्यागाच्या तेजावरच समाजाचे उन्नयन आणि उत्थापन होत असते. पुस्तकेच केवळ वाचू नका. माणसं वाचा. परिस्थिती वाचा मन प्रगल्भ आणि प्रबुद्ध बनवा. तुम्ही उद्याचं नेतृत्व आहात. पण नेतृत्वाला वक्तृत्वाचे आणि कर्तृत्वाचे दोन पंख असतील तरच ते यशाच्या उत्तुंग शिखराकडे झेप घेऊ शकते. वक्तृत्वाचा पंख दुबळा असला तर नेतृत्वाला कर्तृत्व असूनही नीट उडता येत नाही आणि नेतृत्वाकडे वक्तृत्वच असेल आणि कर्तृत्वाचा पंखच नसेल तर त्याला झेपच घेता येत नाही. हे यशस्वी होण्याचे वास्तव लक्षात घ्या.

कर्तृत्व सर्वसमावेशक आणि सर्व समाजाचं हित साधणारं रचनात्मक हवं आणि वक्तृत्व सोन्याच्या नाण्यासारखं मौलिक आणि खणखणीत असलं पाहिजेत.

सिसेरो असं म्हणतो, की तुम्ही वक्ते आहात आणि तुम्ही एक तास भाषण केले तर तुमचा स्वत:चा एकच तास जातो. पण तुमच्या भाषणाला पाचशे श्रोते आहेत. तर मात्र त्या पाचशे श्रोत्यांचे पाचशे तास जातात. म्हणून तुमचं भाषण कसं असलं पाहिजे? तुमच्या एका तासाच्या भाषणाचं मूल्य पाचशे तासांच्या बरोबरीचं असलं पाहिजे. वक्तृत्वाचे हे सामर्थ्य ज्या दिवशी तुम्ही कमवाल त्या दिवशी माझ्या मनाला आनंदाची भरती येईल. आणि जरी मी तुमच्या पेक्षा वयाने मोठा असलो, तरी त्या दिवशी तुमच्या प्रज्ञेला मी सॅल्यूट करेन.

मित्र हो! सजगतेने जग पहात रहा आणि वाहत्या पाण्यासारखे सातत्याने लिहीत रहा सावधपणे काळाच्या हाका ऐका. मराठी वाणी मध्ये फार मोठं सामर्थ्य आणि सौंदर्य आहे. पण ते कमावता आलं पाहिजे.

या समाजात आनंदाचं चांदण फुलायचं असेल तर आमच्या वाणीमध्ये शारदीय चंद्रकळेचा सुमधुर गोडवा असला पाहिजे. तुम्ही स्वत:ची जीभ जिंका आणि जग जिंका. पण हे शक्य आहे का? होय शक्य आहे लेखक किंवा नागरिक म्हणून तुमची वाणी मलमुखी असता कामा

नये. मल सर्वांना अप्रिय वाटतो. सर्वच त्याला टाळून टाळून पुढे जातात. ज्याच्या जिभेला शिव्या टांगलेल्या असतात तो मलमुखी असतो. तो रागाची आग ओकत दुसऱ्याला जाळत असतो. तुमची वाणी मुलमुखी असता कामा नये.

मित्र हो! तुमच्या आणि समाजाच्या जीवनात सुखाचा सुगंध दरवळायचा असेल तर तुमची वाणी पुष्पमुखी असली पाहिजे. तिच्यातून सद्भावना, सद्विचार आणि सदाचाराचा गंध दरवळला पाहिजे. तुमची वाणी मध मुखी असली पाहिजे म्हणजे तुमच्या वाक्या - वाक्यात आणि विचारात मधाचा गोडवा असला पाहिजे. मध हा पौष्टिक असतो. तुमचे विचारही समाजाला पोषक आणि हितदायी असले पाहिजे. लेखक कवींनी जगाच्या, समाजाच्या हितासाठी जाणीवपूर्वक या पुष्पमुखी आणि मधमुखी वाणीचा वापर आपल्या साहित्यकृतीतून केला पाहिजे.

मित्र हो ! तुमच्या व्यक्तिमत्त्वाला बहुभाषी फांद्या फुटल्या पाहिजेत. मातृभाषेबरोबरच राष्ट्रभाषेतूनही लिहा. म्हणजे संपूर्ण भारताशी तुम्ही जोडले जाल. इंग्रजीचे गुलाम होऊ नका. पण इंग्रजीतही लिहायला शिका. एकाच वेळी तुम्हाला महाराष्ट्र आवश्यक असेल तेव्हा भारताशी आणि गरज असेल तेव्हा जगाशी संवाद साधता आला पाहिजे. जागतिकीकरणाच्या, खाजगीकरणाच्या आणि उदारीकरणाच्या या युगात स्पर्धेत टिकायचं असेल, आपले अस्तित्व आणि अस्मिता, साहित्य आणि संस्कृती जपायची असेल, तर नव्या जगाप्रमाणे चालल पाहिजे.

विद्यार्थ्यांचे जे साहित्य आले आहे त्यातून मला जाणवलं, की आजचा विद्यार्थी जागरूक आहे. स्वत:च्या बोलावर आणि माय मराठीवर त्याचं प्रेम आहे. अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी, मराठवाडी, वारली, आगरी या बोलीभाषेतील कवितांतून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या भावभावनांचे, वेदना संवेदनाचे दर्शन मला घडले. ते खरोखरच विलोभनीय आहे. तुमच्या आस्वादसाठी हे काही नमुने बघा.

**ग्रामीण बोलीचा गोडवा :**

प्रमाण भाषा विशेषत: महाराष्ट्राच्या महानगरांची भाषा आहे. सर्वत्र तिचाच बोलबाला असतो. प्रमाण मराठी भाषेलाच श्रेष्ठ मानले जाते. तिलाच पत आणि प्रतिष्ठा. समाजात अभिजन श्रेष्ठ मानले जातात. त्यामुळे ते जी प्रमाणभाषा बोलतात तिला ते श्रेष्ठ समजतात. आणि ग्रामीण बोलीची मात्र हेटाळणी केली जाते. 'ग्राम्य' 'गावंढळ' आणि 'धेडगुजरी' भाषा म्हणून तिची संभावना केली जाते. हा दृष्टिकोनच अत्यंत चुकीचा आणि बोली भाषावर अन्याय करणारा आहे.

वास्तविक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ग्रामीण भागाच्या कडेकपारीत वऱ्हाडी, अहिराणी, झाडी, मालवणी, कोकणी, मराठवाडी, वारली, आगरी ह्या ग्रामीण बोलीचे सुंदर झरे झुळझुळताना दिसतात. या झऱ्या मध्ये जिवंतपणा आहे. त्यांना स्वत:चा नाद आणि लय आहे. स्वत:चा एक लडिवाळपणा आणि लोभसपणा आहे. या बोलीभाषांचं स्वत:च एक स्वत्व, सत्व, सामर्थ्य आणि सौंदर्य आहे. यातील प्रत्येक मराठी बोली म्हणजे वाक्प्रचार व म्हणीच्या माणिक मोत्याची खाण आहे. हाच खरा महाराष्ट्र आहे. हे भान ठेवून आणि बोली भाषांची हिरावून घेतलेली प्रतिष्ठा तिला प्राप्त व्हावी. या हेतूने राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलनात बोली-भाषा काव्य स्पर्धेचे आम्ही आयोजन केले. उत्तम प्रतिसाद मिळणारच याची मला खात्री होती. म्हणूनच, बोली काव्यस्पर्धा घेण्याचे धाडस विद्यार्थी संमेलनाचा प्रमुख या नात्याने केले.

**अहिराणी बोली :**

अहिराणी बोली एकदा कळली की तिचा गोडवा परत परत आस्वादवासा वाटल्या शिवाय राहात नाही.

चाळीसगावचा विद्यार्थी दिनेश चव्हाण त्याच्या 'गरीबी' या अहिराणी कवितेत गरीबीची ठणक नेमकेपणाने व्यक्त करतो. तो म्हणतो -

कष्ट करीसन रोज
घाम आंगना गये
घोटभर पोटसाठे
जीव आम्हलेच गीये
हाऊ आंगठा आम्हना
कोठे कोठे ल्हयी गया
याना पायरे कष्टाना
पैसा भी वाया गया

सुई मागून जसा दोरा यावा तसे गरीबी पाठोपाठ दुःख येते. स्वातंत्र्य मिळाले. पण त्या स्वातंत्र्य सूर्याच्या प्रगतीचा प्रकाश सामान्यांपर्यंत पोचलाच नाही. म्हणून तर नामदेव ढसाळ सारखा कवी कच्या गाढवीचं नाव आहे स्वातंत्र्य? असा परखड प्रश्न विचारतो. ज्ञानाच्या उजेडापासून सामान्यांना वंचित ठेवलं गेलं. आंगठा हे अडाणीपणाचं प्रतीक. या अंगठ्यामुळे जीवनाची कशी वाट लागली त्याचे दुःख शब्दचित्र कवीने रेखाटले आहे. जोतीराव फुले म्हणाले होते -

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गती विना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
एवढे अनर्थ एका अविद्येने केले.

अविद्या हे दुःखाचे मूळ आहे, हे जोतीराव फुले सांगतात. तर अंगठा म्हणजे अडाणीपणा हे आमच्या जीवनाच्या उध्वस्ततेचे कारण असल्याचे कवी दिनेश चव्हाण सांगतो. करीसन (करुन) आंगना (अंगणात) गये (गळे) गीये (गिळे) हाऊ (हा) ल्हयी (घेऊन) पायरे (त्या पायी) कष्टाना (कष्टाचा) ही अहिराणी शब्दकळा खास आपले लक्ष वेधून घेते.

दिनेश चव्हाण च्या 'माहेरनी गोडी ' या अहिराणी कवितेत माहेरच्या प्रेमाचा झरा खळखळतो आहे. कवी म्हणतो -

मन्हा माहेरनी गोडी
जशी जरीनी साडी
साय जशी दूधवर
तशी मायनी मी लाडकी
भाऊ म्हणस कसा मले
तूब सोनाना हार
ताई तुन्हा डोयामान
आसु नही देखणार

कल्पना सौंदर्याने, उपमा अलंकाराने ही कविता नटलेली आहे. पहिल्या कडव्यात जरीच्यासाडी सारखं माहेरचं मोठेपण कसं चमकदार आहे ते दर्शविले आहे. दुधावरच्या सायीसारखी मायची मी लाडकी असल्याचं लेक सांगते.

दुसऱ्या कडव्यात भावाच्या मनाला बहिणीच्या प्रेमाचा पान्हा कसा फुटला आहे ते जाणवतं. भाऊ बहिणीला सोन्याच्या हाराची उपमा देतो आणि बहिणीच्या पापण्या पाणावलेल्या कधीच तो पहाणार नाही. याचं भान प्रकट झालं आहे.

मन्हा (माझ्या) लाडो (लाडकी) म्हणस (म्हणतो)डोयामानं (डोळ्यात) ही अहिराणी सुंदर इरकल मराठीत भर घालणारीच आहे.

अमळनेरची धनश्री मेस्त्री ही विद्यार्थिनी कौटुंबिक मूल्यांची हेळसांड आजकालची पोरं कशी करतात त्यावर नेमकेपणाने बोट ठेवत असतांनाच स्वतःच्या मनात आईवडीलांचे स्थान काय? त्याविषयी ती अहिराणी बोलीत लिहिते-

मना मायबाप जसा विठ्ठल रुखमयी
त्यासनी आशिर्वाद माले अमृत ना टायी

त्यासनी माले मोठं कर
काढीसनी पोहले चिमटा
बाहेरनी दुनियामा फशीसनी
पोरे व्हयीग्यात भामटा
मायबाप ना आस्
होत स अनमोल
आते ना पोरसले
त्यान कवडी नही मोल

मना (माझा) त्यासनी (त्याला) माले (मला) ना (च्या ठायी) काढीसनी (काढून) व्हयीग्यात(झालेत) होतस (आहेत) आते ना (आताच्या) ही अहिराणी शब्दाकळा कळली म्हणजे त्यातील सौंदर्याचा प्रत्यय येतो. अहिराणी बोलीवर हिंदी - आणि गुजराथी भाषेचा प्रभाव आहे. आजचा विद्यार्थी वर्ग समाजाच्या समस्यांचा विचार करणारा आहे. अमळनेरच्या कु. धनश्री मिस्त्री हीच्या 'समानता' या कवितेतून याचा प्रत्यय येतो. समाजात आजही स्त्री - पुरुष विषमतेचा प्रत्यय येतो. गर्भजल तपासणीत मुलगी होणार असे कळताच गर्भपात केला जातो. त्यामुळे हजार पुरुषांच्या मागे वेगवेगळ्या जिल्ह्यात स्त्रियांचे प्रमाण कुठे ८५०, तर कुठे ८०० च्या आसपास आहे. असेच सुरू राहिले तर मुलीचे प्रमाण फारच कमी होऊन समतोल बिघडेल, २०० मुलांना लग्नासाठी मुली मिळणार नाहीत. असेच प्रमाण बिघडत राहिले तर दोघात किंवा पाच पुरुषात एक बायको असे भयानक चित्र निर्माण होईल. समाधानाची गोष्ट ही आहे की युवाविर्थिनी जागरूक आहेत म्हणूनच धनश्र मिस्त्री अहिराणी बोलीत लिहिते -

महाराष्ट्र माझे पोरीसनी कमतरता
कशी काय व्हईन सांगा देशमा स्त्रीपुरुष समानता
घ्यामा शे खान्देश मातर सर्वासना म्हुरे
खान्देश मा जठे देखो तठे पोरेच पोरे
पोऱ्या व्हओ का पोरं
जव्हय स्वीकार करशात खुशीमा
तव्हेच तर व्हईन भारत
महासत्ता २०२०

शे (आहे) पोरीसनी (पोरींची) व्हईन (होईल) देशमा (देशात) म्हुरे (पुढे) जठे (जेथे) तठे (तेथे) व्हओ (होओ) जव्हय (जेव्हा) करश्यात (कराल) तेव्हेच (तेव्हा) या अहिराणी शब्दकळेत हिन्दी भाषेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. मुलगी होवो की मुलगा आनंदानं त्याचा स्वीकार कराल तरच देश महासत्ता होईल असे धनश्री म्हणते. म्हणजे आजची तरुण विद्यार्थिनी स्त्री - पुरुष समतेची आणि भारत महासत्ता होण्याची स्वप्ने पहात आहे. ही बाब अत्यंत आनंददायी आणि आश्वासक आहे.

**वऱ्हाडी बोलीची लज्जत :**

मराठी बोली भाषांमध्ये वऱ्हाडी बोलीचा गोडवा, या बोलीची लज्जत न्यारीच आहे. या बोलीची स्वतःची एक लय, आणि लकत्व आहे. या वऱ्हाडी बोलीला ताज्या हुरड्याची चव आहे.

अकोला जिल्हातील मोरगाव येथील स्वप्नील राजेश इंगोले या विद्यार्थ्याने लिहिलेल्या अंतर्मुख करणारे दर्शन घडविले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संदेश दिला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा! प्रत्येक बाप आपल्या पोराला शाळेत घालायला लागला. पण शिकूनही नोकरी लागत नाही. नोकरी साठी पैसे हवे आणि पैशासाठीच तर नोकरी हवी. पैसे देऊन नोकरी 'विकत' मिळते. या धगधगत्या वर्तमान वास्तवाला या तरुण कवीने वेशीवर टांगले आहे. तो म्हणतो-

कितीही शिकून बाबा
नोकरी घ्याच लागते 'इतक,
बस्स झालं बाबा
आता मी नाही शिकत.
'शिक... शिक... पोरा,

शेती म्हणजे मरण हाय,
जितेपणी सरण हाय...

सर्वात जास्त आत्महत्या विदर्भातील शेतकऱ्यांनी केल्या आहेत. हा कवी इतर मराठी कवींसारखा पानाफुलात रमत नाही. दाहक परिस्थितीची स्पंदन त्याच्या कवितेत उमटतात. शेती आणि कास्तकारी म्हणजे काय? याचं भयावह चित्र त्याने साकार केले आहे.

दर्शनकुमार चांभारे हा कवीही वऱ्हाडी शेतकऱ्याच्या वेदना संवेदनांना शब्दरूप देतो. गरीबी श्रीमंतीतील सीमारेषाही तो बोलकी करतो. वऱ्हाडी बोलीत तो लिहितो. कास्तकाराच्या धोतराले इथं सतरा थिगळं अधिकाऱ्याच्या सुतप्यात दिसत नाही मळं कास्तकाराले आत्महत्या कराले उपयोगी पडे इथे बैलाचं चऱ्हाड. विदर्भातील जळजळता प्रश्न म्हणजे दारिद्र्याच्या दाहकतेत होरपळणारा शेतकरी. कवीची संवेदनशीलता बोथट नाही म्हणून ती वेदना त्याला आपली वाटते आणि तो तिची ठणक वाचकापर्यंत पोचवण्यात यशस्वी झाला आहे.

**मराठवाडी बोली – मन्याडी :**

मन्याडी ही मराठवाडी बोलीची पोटबोली आहे. मन्याडी बोलीतील शब्दकळेने माझ्या शब्दज्ञानात भर पडली. तरण्या ताई बाईला एकटी न फिरण्याचा इशारा कवी देतो. त्यातून वासनेने सरपटणाऱ्या पुरुषी वृत्तीचे दर्शन समाजात कसे घडते त्याचा प्रत्यय येतो. नांदेड जवळील आंबुलगा या गावचे कवी शिवाजी आंबुलगेकर हे 'लावा शिंगूट सांजला' या कवितेत लिहितात –

एकलीच ताई – बाई
नको हिंडु घरी – दारी
दुनियेच्या आयचनी
सर्प हिंडती इरवारी
नको राहू आलुमालु
सांग बाळग एखादी
लाव शिंगूट सांजला
सासूल लागण्या आधी

बाई गं! एकटी – दुकटी फिरु नकोस. विषारी साप फिरत आहेत. सोबत 'सांग' बाळग म्हणजे पाते लवलेला बांबू सोबत ठेव. सापाची सासुल म्हणजे चाहुल लागण्याआधी जनावराचे शिंग जवळ ठेव असे कवी सांगतो.

**वारली बोलीची लकब आणि लय :**

संसाराची स्वप्न रेखाटणारी पण वास्तवाचे भान असलेली चिंचणी महाविद्यालयाची संजीवनी ठाकरे आपल्या वारली बोलीतून भावनांची उत्कट अभिव्यक्ती साधते. ती म्हणते –

मालं सासू – मामा आयात्रा सारखं मिलतील काय
माझं सपन पुरा होल काय?
मी आधा शिकेल आहुत
मालं पण शिकेल असाच भातारा मिलल काय?
अडाणू भेटला तर ...
जुन्याच परंपरा, त्याहच्याच सवयी यातुच
मालं रहायलं लागल काय?
मालं पण दारू पियालं सांगतील त
माझा काय होल...
माझा शिकेलपणाचा फायदा मालं करता
येल काय?

संजीवनीच्या कवितेत तिला पडलेले प्रश्न हे प्रतिनिधिक आहेत. शिक्षण घेतल्यामुळे तिच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. तिला 'शिकेल भातारा' म्हणजे नवरा हवा आहे. दारुविषयी तिच्या मनात किळस आहे. स्त्री मनाची स्वाभाविक घुसमट वारली बोलीतून संजीवनीने समर्थपणे प्रकट केली आहे. नवी पिढी काय विचार करते आहे तिच्या काय आकांक्षा आहेत ह्याचे उत्कट शब्दचित्र वारली लयीन येथे साकार झाले आहे.

तरुण मनाला नेहमीच जीवन ही फुलांची बाग वाटत असते पण मित्र हो काटेही जागोजाग असतात. याच भान ठेवा. पदवी घेऊन बाहेर पडाल. तेव्हा नैराश्याच्या तळपत्या उन्हात तुमची तगमग होईल. अस्वस्थ व्हाल पण त्याही स्थितीत तुमच्या मनाच्या वेलीवरील कवितेच्या कळ्या कोमेजू देऊ नका. त्या फुलवत ठेवा. त्या तुमचं जीवन फुलवत राहतील. आयुष्यात आनंदाचा गंध दरवळत ठेवतील. अस्वस्थपणात तोल जाऊ देऊ नका. अस्वस्थपणा सृजनशील बनवा. तुमच्या मनातील धगधगता असंतोष वाया जाऊ देऊ नका. त्याला सृजनशील बनवा सृजनाच्या सोन्याचे विविध साहित्य प्रकारातील अलंकार घडवून रसिकांच्या चरणी अर्पण केले पाहिजे. तुमच्या साहित्यकृती स्वान्त सुखाय असण्यापेक्षा त्यामधून सूचकतेने कलात्मकतेने प्रबोधनाचा गंध दरवळला पाहिजे.

चांगली कविता कोणती? असा जर प्रश्न मला कोणी विचारला तर मी म्हणेन जी वाचून संपताच मनात सुरू होते ती चांगली कविता होय. हे विद्यार्थी साहित्य संमेलन आज संध्याकाळी संपन्न झाल्यानंतर... संपल्यानंतर तुमची पावले घराकडे पळताना संमेलन तुमच्या मनात सुरु झालं पाहिजे. विचारांचे धन घेऊन एक नवी जीवन दृष्टी आणि साहित्यदृष्टी घेऊन तुम्ही इथून जाणार आहात.

असं समजू नका की माझ्यात आणि तुमच्यात निर्माण झालेल्या नात्याला आता पूर्ण विराम मिळाला आहे. आता तर कुठे आपल्या नात्याला हिरवीगार पालवी फुटली आहे. अजून मोहर यायचा आहे पण त्यासाठी कुठल्यातरी अनुभूतीनं तुमचे मन मोहरले पाहिजे. प्रतिभेचा वसंत तुमच्या मनात फुलला पाहिजे. इथून जाताना आठवणींच्या विविध रंगी कळ्या घेऊन जा. पुन्हा भेटाल तेव्हा त्या कळ्यांची कविता रूपे फुले उमललेली मला दिसली पाहिजे. नव्हे, त्या काव्य फुलांचा गंध महाराष्ट्रात पोचवण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. होय, मी तर तुमच्या सोबत असणारच आहे.

मला मध्यंतरी एक सुंदर एस.एम.एस. आला. त्यात लिहिलं होतं की; ''परवा मी हुशार होतो, तेव्हा मला वाटायचं हे जग बदललं पाहिजे. आता मी शहाणा झालो आहे, आता मला वाटतं की प्रथम मलाच बदललं पाहिजे.''

युवा विद्यार्थी तोच; ज्याच्या मनाच्या कडेकपारीत उत्साहाने, ऊर्मीचे, ऊर्जेचे उत्स्फूर्ततेचे नादमधुर झरे झुळझुळतात. युवा विद्यार्थी तोच; ज्यांच्या मनोभूमीत सृजनाचे हिरवेगार अंकुर निळ्याभोर आकाशाकडे झेपावण्यासाठी पहात असतात. युवा विद्यार्थी तोच; ज्याच्या समर्थ आणि सुंदर हातातून कर्तृत्वाचे झरे झुळझुळतात आणि मानवी मूल्यांची रोपं ज्याच्यामुळे वाढायला लागतात. याच युवा विद्यार्थ्यांच्या मनाची साहित्यिक, विचारवंत म्हणून जडण-घडण होण्याची संधी हे संमेलन देणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांचा वाङ्मयीन 'चेहरा' प्राप्त होणार आहे.

आता जी तुम्हाला पाच प्रतिज्ञा देत आहे. मी आधी म्हणतो तुम्ही मागे म्हणा.

## विद्यार्थ्यांसाठी पंचशील

हा देश अखंड राहावा आणि समाजात कायम एकात्मता नांदावी तुमचे जीवन नेहमी सुखकर आणि सुंदर व्हवे तुमच्या अंगणात नेहमीच आनंदाचं चादंण फुलावं म्हणून मी तुम्हाला पाच प्रतिज्ञा देत आहे. हवंतर तिला आचार संहिता म्हणा किंवा विद्यार्थ्यांसाठी पंचशील म्हणा. तुमच्या कल्याणा साठी ते आवश्यक आहे.

१) देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे मी काटेकोरपणे आणि प्रमाणिकपणे पालन करेन अशी मी प्रतिज्ञा करतो.

२) मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी यासाठी आणि मराठी समाज साहित्य आणि संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी मी सजगपणे सतत प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करतो.

३) शारीरिक, मानसिक आणि वैचारिक दृष्ट्या मी कुणाचाही गुलाम होणार नाही आणि मानवी मूल्यांचा मी पहारेकरी असल्याने कुणालाही गुलाम न करता कुणालातरी गुलाम करू पाहणाऱ्यांना रोखेन अशी मी प्रतिज्ञा करतो.

४) मी कुणावरही कोणत्याही स्वरूपाचा अन्याय किंवा कुणाचेही शोषण करणार नाही आणि माझे कुणी शोषण करण्याचा किंवा माझ्यावर अन्याय करण्याचा प्रयत्न झाल्यास मी तो सहन करणार नाही, अशी प्रतिज्ञा करतो.

५) मी देशभक्त असल्याने माझ्या लाडक्या मातृभूमीवर आणि मी राष्ट्रभक्त असल्याने मातृभूमीवर राहणाऱ्या सर्व स्तरातील सर्व मानवी समूहांवर सारखेच प्रेम करण्याची आणि त्यांच्याशी भाऊ आणि बहीण म्हणून वागून त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा मी करतो.

ह्या प्रतिज्ञा म्हणजे आपल्या आयुष्याच्या हिरव्यागार झाडावर आनंदाची फुले उमलावीत म्हणून स्वतःच स्वतःला करावयाच्या कृतिशूर आज्ञा आहेत.

विश्वविख्यात ऑक्सफर्ड विद्यापीठाने 'दी मेकर्स ऑफ दी युनीव्हर्स' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. या ग्रंथात गेल्या दहा हजार वर्षात ज्या-ज्या जागतिक महापुरुषांनी विश्वाच्या उभारणीत विशेष असे योगदान दिले आहे आणि जे विश्वमान्य झाले आहे अशा १०० महापुरुषांची यादी देण्यात आली आहे. त्यात चौथे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे.

सबंध भारतीयांसाठी ही आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे की विश्वाच्या उभारणीत गेल्या दहा हजार वर्षात ज्यांचे योगदान आहे. त्या शंभरजणांच्या यादीत पहिले आणि चवथे नाव भारतीय आहे. उद्याचे 'पॉवर हाऊस' असलेल्या विद्यार्थ्यांनो तुम्ही तुमच्या समोर, खुजं, खुरटं ध्येय ठेवू नका. महान ध्येय ठेवा. गल्लीत मिणमिणारी गल्ली उजळणार पणती होण्यापेक्षा, समाज, देशच नव्हे तर विश्व उजळवणारे सूर्य व्हा.

चंद्राची प्रकाशमान शीतलता आणि सूर्याची प्रखर तेजस्विता तुमच्यात निर्माण करा. तुमच्या वक्तृत्व आणि कर्तृत्वाच्या पंखांनी गगनाला गवसणी घाला. जातीच्या, धर्मभेदाच्या प्रांतभेदाच्या, भाषा भेदाच्या काटेरी कुंपणात अडकू नका. विश्वाच्या विलोभनीय शिखरावर झेप घ्या. काळाच्या काळ्याभोर कातळावर तुमच्या कर्तृत्वाची सुंदर लेणी खोदा. भारतीय तरुणांच्या प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत हातांची नोबेल पारितोषिक वाट पहात आहे. तुमच्या मनोभूमीत विश्वबंधुत्वाचा झरा झुळझुळू द्या.

तुमच्या मानस सरोवरात करुणेचे कमळ डोलू द्या आणि मग बघा, यश तुमचेच आहे. होय, तुमचेच!

या भाषणाचा समारोप मी माझ्या 'हात' या कवितेने करीत आहे. ती कविता अशी आहे.

कडक इस्त्रीतील कपडे म्हणाले,
दामू भाऊ . . .
बंधुता म्हणजे काय रे?
कवितेतून झुळझुळत
मी म्हणालो.
'जेव्हा लागते हाताला
तेव्हा रडतात डोळे
जेव्हा डोळे रडतात
तेव्हा हात पुसतात डोळे.'

**प्रा. दामोदर मोरे**
बी/३ न्यू लक्ष्मी विहार
चिंचपाडा रोड, काटेमानिवली,
कल्याण (पूर्व) ४२१ ३०६
भ्रमणध्वनी - ९८६७३३०५३३

●●●

# साहित्य - जगत

*साहित्यातील नवीन माहिती या लेखातून दिली आहे. - संपादक*

**साधना साप्ताहिकाचा संग्राह्य विशेषांक :**

गेली ६३ वर्षे चालू असलेल्या 'साधना' साप्ताहिक या दर्जेदार साप्ताहिकाचा फेब्रुवारी २०११ चा साहित्य व समाजकार्य हा विशेषांक प्रत्येकाने जरूर वाचावा. हा अंक उत्कृष्ट व संग्राह्य आहे.

विख्यात समाजसेवक व साहित्यिक साने गुरुजी यांनी स्थापन केलेल्या या साप्ताहिकाचे सांप्रतचे संपादक मंडळ असे आहे. नरेंद्र दाभोळकर - संपादक, विनोद शिरसाट - कार्यकारी संपादक सहयोगी संपादक मंडळ, अभय टिळक (अर्थकारण) राजा शिरगुप्पे (सामाजिक), अवधूत परळकर (सांस्कृतिक), संजय भास्कर जोशी (साहित्य) वा. व. व्यक्तिगत रु ४००/- , संस्थेसाठी रु ५००/-

**महाराष्ट्र फाउंडेशन :**

अमेरिकेत स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय व्यक्तींनी १९७८ साली या संस्थेची स्थापना केली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली २२ वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादन वाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक, श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउंडेशन' या संस्थेद्वारे होत असते. आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या आहेत. विशेष अभिमानाची बाब म्हणजे संस्थेच्या सर्व कामांची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा' ने 'महाराष्ट्र फाउंडेशन' ला स्पेशल कन्सलटेटिव्ह स्टेटस' हा विशेष दर्जा दिलेला आहे. यामुळे फाउंडेशनला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे. 'Invest in future of those with no future... so taht they can reinvest' हे महाराष्ट्र फाउंडेशनचे घोषवाक्य आहे.

१९९४ पासून 'साहित्य' क्षेत्रातील व्यक्तींना व १९९६ पासून 'समाजकार्य' क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या उल्लेखनीय व अनुकरणीय योगदानासाठी पुरस्कार दिले जातात. पूर्वी या पुरस्कारांचे संयोजन मुंबईच्या केशव गोरे स्मारक ट्रस्ट वतीने केले जात होते. गेल्या वर्षापासून या पुरस्कारांचे संयोजन 'साधना ट्रस्ट' करीत आहे. साहित्य व समाजकार्य या दोन क्षेत्रांत मिळून दरवर्षी दहा ते बारा पुरस्कार अर्ज न मागवता दिले जातात साहित्य क्षेत्रात एक जीवन गौरव पुरस्कार आणि चार किंवा पाच ग्रंथपुरस्कार तर समाजकार्य क्षेत्रात एक जीवन गौरव पुरस्कार आणि चार किंवा पाच कार्यकर्ता पुरस्कार अशी सध्याची विभागणी आहे. यंदाच्या पुरस्कार वितरणाचा समारंभ पुणे येथे ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर व ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक अमोल पालकर यांच्या हस्ते २६ जानेवारी रोजी पार पडला.

**साहित्य व समाजकार्य विशेषांक :**

यावर्षी साहित्य व समाजकार्य क्षेत्रांतील एकूण बारा व्यक्ती व कोल्हापुरचे जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांना लक्षवेधी प्रशासकीय कार्यासाठी पुरस्कार देण्यात आले.

या सर्व १३ पुरस्कार प्राप्त व्यक्तींवरील प्रत्येकी दोन लेख ('मनोगत' व 'आलेख') समाविष्ट असलेला हा विशेषांक आहे. पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी 'मनोगत' मध्ये

---

अधर्म, अनीती, अनाचार यांच्या साह्याने मिळविलेला जय कोणत्याही पराजयापेक्षा लांच्छनास्पद आहे.

स्वत:चा जीवनविषयक दृष्टिकोन आपल्या कामामागील प्रेरणा आणि आजच्या सामाजिक जीवनावरील भाष्य या तीन पैकी एक-दोन किंवा तीनही घटकांवर त्यांनी लिहावे अशी त्यांना विनंती करण्यात आली होती. पुरस्कारप्राप्त व्यक्तीचे विचार व कार्य यांच्याशी उत्तम परिचय असलेल्या व्यक्तीला लिहण्यास सांगण्यात आले होते आणि त्यांत त्यांनी पुरस्कार प्राप्त व्यक्तींच्या विचारांचे व कार्यांचे वेगळेपण कशात आहे, त्यांचे नेमके योगदान काय आहे. आणि आजच्या काळातही त्यांचे विचार आणि कार्य किती प्रस्तुत आहे अशी अपेक्षा होती. सर्व लेखकांनी या सूचनांना अनुसरून उत्कृष्ट लेख लिहिले आहेत ते मुळातूनच सर्वांनी वाचावेत असा माझा खास आग्रह आहे.

साहित्य पुरस्काराचे मानकरी (२०१०)

साहित्य जीवन गौरव - (ज्येष्ठ पत्रकार व ग्रंथकार)

- विशेष ग्रंथ - 'दगडावरची पेरणी' (कार्यकथन - ले सय्यदभाई संपूर्ण नाव सय्यद मेहबूब शहा कादरी वल्द सय्यद गौस शहा कादरी - पुणे)
- वैचारिक ग्रंथ - साम्राज्यवाद विरोध आणि जातीविनाश ले. आनंद तेलतुंबडे - मुंबई त्यांच्याच Ante imperialism and Anmiliation of castes या इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद

अपारंपारिक ग्रंथ - 'आणि दोन हात' (अनुभव कथन) - ले. डा. वि. ना. श्रीखंडे (मुंबई)

ललित ग्रंथ - रिबाट (कादंबरी) ले. जी. के. ऐनापुरे (सांगली)

रा. शं दातार नाट्य पुरस्कार आनंदाभोग (नाटक) - ले आशुतोष पोतदार (कोल्हापूर)

या विशेषांकात प्रसिद्ध झालेली वरील पुरस्कार प्राप्तांची मनोगते अनुक्रमे पुढीलप्रमाणे : वैचारिक स्वातंत्र्याची मोठी लढाई खेळावी लागणार आहे - डॉ. अरुण टिकेकर हमीद दलवाईनी पेरलेला आता उगवू लागला आहे. माझी पुस्तके माझ्या कृतिशीलतेचा भाग असतात! रुग्ण - डॉक्टर संबंध बिघडणं ही चिंतेची बाब आहे! बुद्ध आणि मार्क्स माझ्यासाठी एकरेषीय जी . के. ऐनापुरे - डॉ. विना श्रीखंडे चिकित्सक आकलन करून घेण्याची इच्छा आहे. आशुतोष पोतदार या सर्वांची ओळख करुन देणारे आहेत अनुक्रमे अबरोश मिश्र शमसुद्दीन तांबोळी, संदीप पेंडसे, अचला जोशी अशोक बाबर आणि रफीक सूरज

**दानशूर सुनील देशमुख:**

मराठी भाषा, समान संस्कृती याबद्दल कमालीचे प्रेम असलेले अमेरिकेतील श्री. सुनील देशमुख (emailsunild@aolcom) हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. ते मोठे उद्योजक आहेत. त्यांनी महाराष्ट्र फाउंडेशनला एक कोटी रु ची देणगी दिलेली आहे. या महाराष्ट्र फाउंडेशनकडून अनुदान मिळण्यासाठी जी प्रक्रिया करावी लागते त्याची माहिती या संग्राह्य अंकात पृ १०१ वर दिलेली आहे. जिज्ञासूंनी पुढील पत्यावर संपर्क साधावा. Maharashtra Foundation, e/o Ramesh Sarva, CPA Pc, Post Box No. 750 - 250, 109 - 17, 72nd Road, No 6-R, Forest Hills, New York 11375, 6906 - 269-6906 WSA 718 - 268.

**साधना प्रकाशनाची नवी पुस्तके :**

शोधयात्रा (ले. राजा शिरगुप्पे: मूल्य रु. १००/-) महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असतांना ग्रामीण महाराष्ट्रातील दुर्गम भागांची स्थिती नेमकी आहे तरी कशी याचा शोध घेण्यासाठी राजा शिरगुप्पे यांनी जुलै-ऑगस्ट २००९ मध्ये भ्रमंती केली. त्यांतून साकारलेली ही शोधयात्रा. ही शोधयात्रा वाचतांना लक्षात येईल की 'दुर्गम भाग' म्हणजे केवळ डोंगरदऱ्या वा जंगलप्रदेश नाही. जिल्ह्याच्या ठिकाणापासून दहा-वीस कि. मी. अंतरावरील परिसर ही 'दुर्गम' या संज्ञेला पात्र ठरतो आहे.

श्री. शिरगुप्पे यांचे आणखी एक सुंदर पुस्तक (किंमत रु १००/-, 'न पेटलेले दिवे' हे पुस्तक अनेक दृष्टीने परिणाम करतं. कधी ते आपल्याला पेटवते कधी सुन्न करते तर कधी भडकवतेही. त्याला भेटलेली विलक्षण मुलं ज्यांतली बरीच बेघर होती. ती आपल्या मनातच थेट घर करून बसतात. ती स्वत: हलत नाहीत आपल्याला ही हलू देत नाहीत. ती पोरं आपल्या असण्याला, आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला गदागदा हलवतात. आपल्या संस्कृतीची काळजीपूर्वक शिवलेली आणि मढवलेली वस्त्र टराटरा फाडतात आणि आपल्याला उघडं नागडं करून टाकतात.

'कैफियत' ले राजन गवस (मूल्य रु १५०/-) गवस म्हणतात, माझी, माझ्या भोवतालची, प्राण्यांची, पक्षांची, झाडांची माणसांची साऱ्यांचीच कैफियत. आमचं साऱ्यांचच अस्तित्व धोक्यात आलंय. पटणार नाही तुम्हाला, पन खरंच आम्ही जिवंत राहू, तग धरू अशी शक्यता अंधुक झालीय. कोणीतरी निर्दयपणे ओरबाडतंय साऱ्यांना ओरबाडण्यात आम्ही सामील असणारच. कारण ओरबाडणं हिसकावणं लुटणं, लपास करणं म्हणजे काय? हे कळावं, अशी संवेदनाच संपून गेलीय आमच्यातून आम्ही जिवंत आहोत म्हणजे काय? आम्ही काय करतोय? काय बोलतोय ? कळंतच नाही आम्हाला. भांबावून टाकणारं भयग्रस्त करणार भोवळ आपणणार वर्तमान.

**साने गुरुजी यांचे समग्र साहित्य ४६ खंडात उपलब्ध :**

ख्यातनाम प्रकाशन श्री. ह. अ. भावे यांनी साने गुरुजी यांचे समग्र साहित्य ४६ खंडात (एकूण पृष्ठसंख्या १२४८० आकार डेमी अष्टपत्री ) प्रसिद्ध केले आहे. लहान मुलांसाठी आणि मोठ्यांसाठीही त्यांनी विपुल लेखन केलेल आहे. त्यांनी लहानमोठी अशी सुमारे ७३ पुस्तके लिहिलेली आहेत. 'भारतीय संस्कृती' 'श्यामची आई' 'सती' 'सुंदर पत्रे' 'स्वप्न आणि सत्य'. 'श्यामची आई या पुस्तकाची पेपरबॅक आवृत्ती व श्रेयस आवृत्तीही प्रकाशित केली जाणार आहे.

**बाबा भांड यांची तीन नवी पुस्तके प्रकाशित :**

प्रसिद्ध लेखक आणि प्रकाशक बाबा भांड यांची तीन पुस्तके त्यांच्याच साकेत प्रकाशनातर्फे नुकतीच प्रसिद्ध झाली आहेत ती अशी :-

'जुगार' (कादंबरी) - मूल्य रु १५०/- मटका जुगार आणि वेश्या व्यवहारात सर्वस्व उधळून देणाऱ्या आबाचा विलक्षण वर्तन व्यवहार. सगळ्याच क्षेत्रात आज जुगार सुरू आहे. माणसांतल्या अशा जुगारी वृत्तीच्या सनातन प्रेरणाचा शोध घेणारी आणि ऐहिक व पारमार्थिक पातळीवरच्या जुगाराच्या अध्यात्मशास्त्राची नाळ उलमडणारी कांदबरी

'कैलास-मानस' (प्रवास वर्णन) ले बाबा भांड, आशा भांड (मूल्य रु. १५०/-) कैलास मानस हे निसर्गाने निर्माण केलेलं अदभुत स्वप्न हिंदू बौद्ध, जैन, महानुभव भांड दांपत्याच्या या कैलास मानस प्रवासात येत जातो.

इंटरनॅशनल बेस्टसेलर लेखकाचे पुस्तक जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल ( रिचर्ड बाक अनु. बाबा भांड) मूल्य रु. १००/- आपल्या स्वप्नांचा पाठलाग करत जगण्यातील प्रत्येक कृतीच्या सरावात मेहनत कष्टांची साधना म्हणजेच त्या क्षेत्रातील यशाचे शिखर गाठण्याची ही गोष्ट.

**'साकेत सबंगडी ग्रंथवार्ता'**

ऑगस्ट २००९ मध्ये या मासिकाचा प्रथम अंक प्रसिद्ध झाला (सं. प्रतिमा साकेत भांड) (अंकाची किंमत रु १०/- वा. व रु १००/- द्वैवार्षिक रु. २००/- पंचवार्षिक रु. ३००/-) डिसेंबर २०१० च्या अंकात निशिकांत टकार यांचा 'वाचनसंस्कृती आणि वाचकसत्ता' व कवी ना. धों. महानोर यांचा आनंदयोगी पु. ल. हे महत्वाचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. जिसासूंनी वरील पत्यावर संपर्क साधावा.

**- शरद जोशी**
(ग्रंथप्रसारक)

---

# श्री. भाऊसाहेब बांदोडकरांच्या सहवासात गोव्यातील एक दिवस

*१२ मार्च ही भाऊसाहेब बांदोडकरांची जन्मतारीख. त्या निमित्ताने आमच्या मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते मा. मा. ना. पाटील यांनी लिहिलेला विशेष लेख – संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयासाठी देणगी मिळवण्याच्या वेळी १९६९ मध्ये डॉ. वा. ना. बेडेकर आणि श्री. गुणाकार जोशी यांनी माननीय भाऊसाहेब बांदोडकरांची भेट घेतली १२ मार्च ही भाऊसाहेबांची १०० वी जयंती आहे त्या निमित्ताने त्याचा वृत्तांत.

श्री. बाऊसाहेब बांदोडकर गोवा दीव दमण या भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर असलेल्या स्वतंत्र विभागाच्या प्रशासनासाठी मुख्यमंत्री असताना फेब्रुवारी १९६४ रोजी ठाण्यातील डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांचा मुक्काम डॉ. वा. ना. बेडेकरांच्या घरी होता. सकाळी शाळेत सम्मेलन समारंभ पार पाडला. सायंकाळी डॉ. वा. ना. बेडेकरांच्या घरा शेजारी असलेल्या गावदेवी मैदानात श्री. भाऊसाहेबांना विद्या प्रसारक मंडळ, ठाणे नगरपालिका व ठाण्यातील काही संस्था मिळून मानपत्र देण्याचा भव्य समारंभ पार पाडला. श्री. भाऊसाहेब थोडा वेळ डॉ. वा. ना. बेडेकरांच्या घरी होते. त्यावेळी डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. गुणाकार जोशी, श्री. त्र्यं. मो. फडके, धो. वा. टिळू व विद्या प्रसारक मंडळाच्या व्यक्ती इतर काही हजर होत्या. डॉ. वा. ना. बेडेकरांनी श्री. भाऊसाहेबांना मंडळाच्या कार्याबद्दल माहिती देताना ठाण्यात पहिले महाविद्यालय काढण्याच्या विचारात मंडळ आहे तेव्हा आपणाकडून काही आर्थिक मदत मिळावी अशी मंडळाची इच्छा आहे, असे सांगितले. त्यावेळी श्री. भाऊसाहेबांनी आश्वासन दिले होते की जेव्हा तुमचे महाविद्यालय काढण्याचे नक्की होईल तेव्हा मला भेटा. मी थोडीफार मदत करीन.

१९६८-६९ या वर्षात विद्या प्रसारक मंडळाचे ठाण्यात पहिले महाविद्यालय काढण्याचे काम पुष्कळसे पूर्ण होत आले होते. महाराष्ट्र सरकार कडून १९६८ साली खाडीवरची १० एकर जागा मिळाली होती. डॉ. वा. ना. बेडेकरांचे श्वशुर श्री. केशव गणेश उर्फ बाबूराव जोशी यांनी रु. १,२५,०००/- देणगी दिली होती. धुळ्याचे प्रोफेसर दलाल प्रमुख असलेल्या समितीने पुणे विद्यापीठाकडून वाङ्मय व वाणिज्य विभाग असलेल्या महाविद्यालयाची परवानगी पक्की केली होती. विद्या प्रसारक मंडळाची आर्थिक क्षमता अजून वाढल्यास विज्ञान विभागही मिळू शकेल असे प्रो. दलालांनी डॉ. वा. ना. बेडेकरांना कळविले होते.

विद्या प्रसारक मंडळाची महाविद्यालय काढण्याची वरील प्रमाणे प्रगती झालेली विचारात घेऊन, डॉ. वा. ना. बेडेकरांनी त्वरीत मंडळाची एक सभा १९६८ मध्ये एके दिवशी रात्री त्यांच्या 'नारायण भुवन' या वास्तूमध्ये बोलावली. त्या प्रमाणे मंडळाच्या कार्याशी व डॉ. वा. ना. बेडेकरांशी घनिष्ठ संबंध असलेली काही हितचिंतक व्यक्तींनाही सभेला बोलाविले. रात्रीचे जेवण आटोपून सभा १० वाजता भरली होती. जमलेल्या सर्वांना डॉ. वा. ना. बेडेकरांनी सभा तातडीने कशासाठी बोलावली हे सांगितले. विचारविनिमय होऊन रात्री ११.३० नंतर डॉक्टरांनी गोव्याला भाऊसाहेबांना पुन्हा फोन लावला. भाऊसाहेब काही कामासाठी बाहेर जाऊन नुकतेच परत आले होते. त्यामुळे श्री. भाऊसाहेबांनी डॉ. वा. ना. बेडेकरांना भेटण्यास या असे सांगितले. वेळ न घालवता सर्व संधीचा ताबडतोब

फायदा घ्यावा म्हणून फेब्रुवारी १९६९ अखेरीस डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी विमानाने गोव्यास गेले होते.

डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी विज्ञान महाविद्यालयासाठी तयार केलेला अहवाल बरोबर घेऊन गोव्याला पहाटे उजाडता पोहोचले. त्यापूर्वी विज्ञान महाविद्यालयाचा संपूर्ण आराखडा व अहवाल तयार केला होता. तो श्री. मा. ना. पाटील व्यक्तिश: धुळ्याला श्री. दलाल प्रोफेसरांकडे देऊन आले होते व श्री. दलालांनी पुणे विद्यापीठाकडून वाङमय वाणिज्य विभागाच्या परवानगी बरोबर विज्ञान विभागाचीही परवानगी मिळण्याची पूर्तता केली होती. पहाटे उजाडत डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी गोव्याला श्री. भाऊसाहेबांच्या बंगल्यावर पोहोचले. काही वेळा नंतर श्री. भाऊसाहेब खाली अतिथी कक्षांत आले. डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी यांची चहा नाष्ट्याची व्यवस्था करण्यास सांगून श्री: भाऊसाहेब कामासाठी आलेल्या मंडळींकडे गेले. तेथील काम संपवून श्री. भाऊसाहेब बाहेर आले तो पर्यंत डॉ. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी चहा नाष्टा उरकून बसले होते. श्री. भाऊसाहेबांना महाविद्यालयासंबंधी संपूर्ण माहिती व आराखडा समजावून सांगितला. श्री. भाऊसाहेब त्यानंतर आंघोळ व देवाची पूजा करण्यासाठी गेले.



**कै. भाऊसाहेब बांदोडकर**

शांतादुर्गा देवीची पूजा आटोपून श्री. भाऊसाहेब बाहेर आले व डॉक्टर आणि श्री. गुणाकार जोशींना म्हणाले की देवीने मला कौल दिला आहे. मी तुम्हांला महाविद्यालयासाठी देणगी देतो. माझ्या वडिलांच्या नावे बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय सुरू करा. आम्हाला हे ऐकून खूप आनंद झाला. श्री. भाऊसाहेबाचे आम्ही आभार मानले. याप्रमाण सर्व संभाषण व त्या दिवसाचा संपूर्ण भाऊसाहेबांच्या बरोबरचा कार्यक्रम कसा पार पडला याचे डॉ. वा. ना. बेडेकरांनी गोव्याहून परत आल्यानंतर प्रत्यक्ष केलेले वर्णन आहे.

श्री. भाऊसाहेब मुख्यमंत्री असूनही गोव्यास मार्केटमध्ये स्वत: जात असत. बरोबर कोणी अंगरक्षक किंवा पोलीस नसत. श्री. भाऊसाहेब, डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी मार्केट मध्ये गेले. तेथे मासळी विकणाऱ्या बायका,'' भाऊ, सरंगा कोळंबी ताजी असा घेऊन जावा '' असे हाक मारून सांगत होत्या. मार्केटींग झाल्यावर सर्वजणं बंगल्यावर परत आले. तेवढ्यात श्री. भाऊसाहेबांच्या शेतावरचा एक इसम आला होता त्याने शेतीची देखभाल करणारा खूप आजारी आहे, त्याने भाऊंना भेटण्यास बोलावले आहे असा निरोप दिला.

श्री. भाऊसाहेबांकडे शाकाहारी पाहुणचार झाला. दुपारी थोडी विश्रांतीही झाली. श्री. भाऊसाहेब, डॉ. बेडेकर व श्री. गुणाकर जोशींसह शेतावर त्या आजारी माणसाला बघायला गेले. शेतावरच्या झोपडीत त्या आजारी व्यक्तीला श्री. भाऊसाहेब म्हणाले, अरे बाबा तुझ्यासाठी ठाण्याचे डॉक्टर माझ्याबरोबर आले आहेत. डॉक्टर याला तपासा आणि औषध द्या. डॉक्टर बेडेकरांनी त्याला तपासले आणि गोळ्या औषध एका कागदावर लिहून दिले. निरोप घेऊन आलेल्या व्यक्तीने तो कागद घेऊन औषध आणण्यास निघून गेला. शेतीवर थोडा फेरफटका मारुन श्री. भाऊसाहेबांबरोबर डॉक्टर व श्री. जोशी बंगल्यावर आले.

संध्याकाळच्या विमानाची तिकीटे काढलेली होतीच. तेव्हा डॉक्टर व श्री. जोशी श्री. भाऊसाहेबांचा

निरोप घेऊन मुंबईला येण्यास निघाले. श्री. भाऊसाहेबाना विज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचे काम सुरू करताना कोनशिला (पायाभरणी) बसविण्यासाठी ठाण्याला येण्याचे आमंत्रणही दिले. ते सुद्धा श्री. भाऊसाहेबांनी मान्य करुन कधी यायचे कळवा मी नक्की येतो असे सांगितले. निघताना श्री. भाऊसाहेबांनी रु. ३,२०,०००/- पैकी देणगी रु २०,०००/- चा चेक दिला. डॉक्टर बेडेकरांनी श्री. भाऊसाहेबांच्या इच्छेनुसार विज्ञान महाविद्यालयास बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय असे नाव दिले जाईल याचाही उल्लेख केला व दोघे मुंबईस येण्यास निघाले. श्री. भाऊसाहेबांनी मान्य केल्या प्रमाणे विज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीच्या कोनशिलेची दिनाक ४ मे १९६९ रोजी पूजा केली. या शिवाय, श्री. भाऊसाहेबांनी महाविद्यालयांना अनौपचारिक दोन वेळा व्यक्तिश: भेटी दिल्या.

**– श्री. मा. ना. पाटील,**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद,
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## डॉ. कल्पना जोशी
## महाराष्ट्रीयन ऑफ द इयर

ठाण्यातील पारसिकनगर, राजपार्क येथे रहाणाऱ्या डॉ. कल्पना जोशी यांचा अलीकडेच मुख्यमंत्र्याच्या हस्ते गौरव चिन्ह, मानपत्र व रुपये एक लाख देऊन सन्मान करण्यात आला. लोकमत समूहातर्फे पहिल्या 'महाराष्ट्रीयन ऑफ द इयर'. या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. निवड समितीत डॉ. रघुनाथ माशेलकर व अन्य क्षेत्रांतील नामवंत व्यक्ती होत्या. तसेच, लोकमतच्या आवाहनास प्रतिसाद म्हणून देशभरातून व परदेशांतून वाचकांनी त्यांच्या नावास पसंती दिली. ठाणेकरांच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची घटना आहे.

डॉ. कल्पना जोशी या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या महिला शास्त्रज्ञ असून औषध निर्मिती क्षेत्रातील त्यांचे योगदान जगभर मान्यता प्राप्त ठरेल आहे. लोकमत तर्फे विज्ञान – तंत्रज्ञान या विभागासाठी त्यांची निवड झाली. कॅंसर सारख्या अतिशय दुर्धर रोगावर औषधाची निर्मिती करून त्यांनी जगभरातील असंख्य कॅंसर ग्रस्तांच्या जीवनात आशेचा दीप प्रज्वलित केला आहे त्यांनी निर्माण केलेल्या औषधांची कॅनडा अमेरिका आदी देशांत चाचणी सुरु आहे.

डॉ. कल्पना जोशी यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात सर्व महिला शास्त्रज्ञांच्या वतीने आपण हा पुरस्कार स्वीकारत असल्याचे सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांनी महिला संशोधकांसाठी विज्ञान – तंत्रज्ञानाचे स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करण्याच्या आपल्या सूचनेचा विचार करावा असेही सांगितले.

गुप्ता इंजिनिअरींग ग्रोथ यांनी पुरस्कृत केलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास विविध क्षेत्रातील सात मान्यवरांना 'महाराष्ट्रीयन ऑफ द इअर' हा पुरस्कार जाहीर झाला.

डॉ. कल्पना जोशी यांचे पती डॉ. संजय जोशी हे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात (कनिष्ठ) जीवशास्त्र या विषयाचे अध्यापन करतात.

# वेद कालीन - वर्णाश्रम पद्धती

*हिंदू धर्मातील वर्णाश्रम पद्धतीची माहिती देणारा हा लेख - संपादक*

**भूमिका :**

सनातन वैदिक धर्मांत वर्णाश्रम पद्धती समाविष्ट करण्यात आलेली आहे. कारण धर्माचे आचरण वर्ण म्हणजे सामाजिक स्थान आणि आश्रम म्हणजे वयानुरूप व्यवहार यावर आधारित होते. मूलत: वर्णाश्रमाची भूमिका व्यक्तिगत उन्नयन आणि सामाजिक एकोपा यावर आधारलेली आढळते. कालांतराने ही मूळ भूमिका लुप्त झाल्याने आज आश्रमाचा पत्ता नाहीसा झाला आहे आणि वर्ण नाहीसे होऊन, त्यांची जागा जातीने घेतली आहे. वर्ण आणि जाती यांमध्ये मूलभूत फरक असताना, व्यवहारात मात्र जाती म्हणजेच वर्ण असे समीकरण झालेले आढळते. वर्ण चारच असताना जाती का अनेक आहेत याचा विचारही केला जात नाही. वैदिक ऋषींनी वर्णाश्रम पद्धती मुळात कोणत्या कारणासाठी स्वीकारली हे समजून घेणे आवश्यक आहे. पुढील काळात या पद्धतीत अनेक दोष निर्माण झाले. काही दुष्परिणामही घडले आणि आज तर चातुर्वर्ण्य म्हणजे एक निंद्य गोष्ट आहे. या पद्धतीचा विचार करणे मागासलेपणाचे लक्षण आहे इतक्या टोकापर्यंत विचाराची मजल गेलेली आढळते. यासाठीच वर्णाश्रम म्हणजे काय? वर्णाश्रमामुळे पूर्वीच्या काळी व्यक्ती आणि समाज उभयताना एका सूत्रात कसे गोवले होते आणि उभयता एकत्वाचा कसा अनुभव घेत होते, तसेच या पद्धतीत पुढील काळात दोष निर्माण होण्याची कारणे होती, ती कारणे बाजूला सारून पुनरपि या पद्धतीचा शुद्ध स्वरुपात आजच्या बदललेल्या परिस्थितीत विचार करता येईल का, आदी विषयांबद्दल काही विचार या लेखाद्वारे व्यक्त करण्यात आले आहेत.

**वर्ण - आश्रम म्हणजे काय?**

वर्ण म्हणजे जाती नाहीत. वर्ण याचा अर्थ रंग, गुणांचा आविष्कार, गुण मानवाच्या ठिकाणी उपजतच असतात. इतकेच नव्हे जगातील यच्चयावत वस्तु आपल्या गुणांसहितच असतात. त्या गुणांची जोपासना योग्य पद्धतीने झाल्यास त्या विकसित होतात. ही संधी प्राप्त झाल्याने गुणांचा विकास होतो. यांचा विकास शास्त्रशुद्ध रीतीने व्हावा, सुरक्षित पणे त्यांची जपणूक व्हावी आणि त्यामुळे व्यक्ती आणि समाज या उभयतांचे कल्याण व्हावे एवढा व्यापक विचार या वर्ण आणि आश्रम विषयक संबधित करता येईल. वर्ण हे उपजत असल्याने त्यांची निर्मिती कोणा मनुष्य गटाकडून झालेली नाही. हा विचार अगदी स्पष्टपणे भगवंतानी गीतेत मांडला आहे. त्याची निर्मिती भगवंताने स्वत:वर घेतली आहे. चातुर्वर्ण्य मया सृष्टम्। यामुळे एक गोष्ट निश्चित झाली की ही मानवनिर्मित घटना नसून ही मानवाच्या जन्माबरोबरच विद्यमान असलेली घटना आहे.

**वर्णासंबंधी विशेष विचार :**

सांख्य तत्ववेत्ते कपिल मुनींनी सृष्टी निर्माण करणाऱ्या प्रकृतितत्त्वाला अजा म्हणून संबोधले आहे. अजा. एकां लोहित शुक्ल कृष्णां असा उल्लेख करून ती प्रकृति त्रिगुणात्मिका असल्याचे सांगितले आहे. सांख्य कारिकेच्या टीकेतील पहिल्याच श्लोकात हे वर्णन आढळते. सर्व सृष्टी प्रकृति संभव असल्याने थोड्या फार प्रमाणात प्रत्येक वस्तुमानात हे तीनही गुण म्हणजे रंग आहेत असे मानणे अपरिहार्य आहे. आजच्या विज्ञानाने मूळ उत्पत्ती तत्त्वाबद्दल असा विचार मांडलेला आढळतो.

डॉ. हरगोविंद खुराना, नोबेल पारितोषिक विजेते यांनी DNA(De-oxy - ribo - nucliec acid) संबंधी विचार करताना असे म्हणताना – Since DNA controls the colour of one's eyes, the shape of one's body, one's personality and many other factors such as those of which make one man from dog. it was thought that DNA is the master molecule of life. यावरून उत्पत्ती मूलक मूळ घटक द्रव्यात वर्ण आहेत, हे सिद्ध होत आहे. यामुळेच प्रत्येक व्यक्तीत कोणत्याना कोणत्या वर्णाचे आधिक्य वा न्यूनता आढळते. म्हणूनच त्यांच्यात विविध स्तर व्यक्त होताना दिसतात.

श्रीकृष्णाने चातुर्वर्ण्य ही ईश्वरीय निर्मिती एवढेच सांगून न थांबता तो कोणत्या मूलभूत घटकातून अभिव्यक्त होत आहे याचाही उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात ''गुणकर्म विभागय'' ही जी धारणा अथवा असे विभाग घडलेले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने गुणांचे अधिष्ठान आहे. प्रत्येक गुणाचे कार्य वेगळे असल्याने ज्यात ज्या गुणाचे आधिक्य, त्या प्रमाणात त्या गुणानी अधिष्ठित कार्य अभिव्यक्ती. थोडक्यात ज्यांचा जो गुणधर्म असतो, तसेच त्याचे व्यक्तीकरण संभवते. ''कारणगुणा: कार्यगुणं आरभन्ते'' कारणातील गुणच कार्यात अभिव्यक्त होतात. निसर्गातील प्रत्येक वस्तू अशा रीतीने अभिव्यक्त होत असते. उदाहरणार्थ अग्नितत्वाचे स्वरूप वा गुणधर्म पाहिले असता उष्णता व प्रकाश देणे असे आहे. आता अग्नि अनेक रूपात प्रकट होतो हे ध्यानात घेतल्यास अग्नितत्वाचे व्यापक रूप सूर्य होय. म्हणजेच, ज्याचा जसा गुणधर्म असेल तसे त्याचे कार्य असेल. याचा अर्थ, गुणच पदार्थांच्या माध्यमातून अभिव्यक्त होतात. त्या अभिव्यक्तीलाच आपण कार्य वा कर्म म्हणतो.

**समाजरचना :**

हीच भूमिका लक्षात घेऊन गुणानुरूप कर्म घडत असल्याने कोणत्या व्यक्तिमत्वात कोणता गुणधर्म कमी आधिक प्रमाणात आहे हे पूर्वजांनी निरीक्षणातून निश्चित केले. आणि त्याप्रमाणे वर्गवारी केली चातुर्वर्ण्यात नेमके हेच तत्व स्वीकारले गेले. या वर्गवारीमुळेच त्या त्या व्यक्ती महत्वाच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांना प्राधान्य देऊन संपूर्ण समाजाच्या हितासाठी त्या वर्गाद्वारे कर्मांची उभारणी व्हावी या हेतूने ही पद्धती राबविण्यात आली. नैसर्गिकतेलाच योग्य वळण देऊन ते समाज हिताचे कसे होईल याचा विचार आपले पूर्वज सतत करीत असत. याचमुळे गुणाप्रमाणे कमी आधिक जबाबदारीची कर्तव्ये त्या त्या गुणाधिष्ठित गटावर सोपविण्यात आली. कारण समाज नीटनेटका राहण्यासाठी ज्ञान, बळ, अर्थोत्पादान व परिश्रम यांची योग्य जोपासना होणे आवश्यक आहे याची जाण त्यांना होती. आजही या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. हीच भूमिका या चातुर्वर्ण्याच्या योजनेत आहे. पूर्वजांनी याची जोपासना करताना गुणानुरूप समाजाचे चार भाग करून त्या त्या विभागाची ती ती कामे परिश्रमपूर्वक जोपासावीत असा दंडक घातला व अशा रीतीने समाजाची घडण स्थिर केली.

हीच गोष्ट ऋग्वेदातील पुरुषसूक्तातूनही व्यक्त झालेली आढळते. इथे या विभागाना विराट पुरुषाच्या शरीराचे अंग प्रत्यंग असल्याचे म्हटले आहे. यत् पुरुषं व्यदु: । कतिधाविअकल्पयन् । मुखं किं अस्य कौ बाहु । का ऊरू पादौ उच्येते॥ या गोष्टीचा उलगडा पुढील ऋचात विशद करण्यात आलेला आहे. ब्राह्मणोस्य मुखं आसीत् । बाहु राजन्य: कृत: । ऊरू तदस्य यत् वैश्य: । पद्भ्यां शूद्रो अजायत । त्या विराट पुरुषाची रचना व त्याचे अंग प्रत्यंग या संबंधी स्पष्ट भूमिका या दोन ऋचांतून मांडण्यात आली आहे. त्याचे मुख बाहू, मांड्या व पाय यांना अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्र, वैश्य व शूद्र असे संबोधले आहे. एकाच विराट पुरुषाचे हे अंग प्रत्यंग असल्याने संपूर्ण समाज पुरुषाच्या कोणत्या विभागातून कोणत्या प्रकारचे गुण अभिव्यक्त होतात, याचे स्पष्टीकरण केले आहे.

**भेदाचे प्रकार :**

भेद तीन प्रकारचे संभवतात. स्वगतभेद, विजातीय भेद, आणि स्वजातीय भेद. वास्तविक ब्रह्मात कोणताच

भेद संभवत नाही. कारण त्यांच्या ठिकाणी विविधता कल्पिली गेली आहे. ''न इह नानास्ति किंचन'' सारे भेद हे कल्पित आहेत. ज्या प्रमाणे एकाच वृक्षाचे मूळ, खोड, फांदी आणि पाने असतात, परंतु या एकत्र असणाऱ्या वस्तूला वृक्ष ही संज्ञा आहे. म्हणजे, एकाच वस्तूचे अवयव भूत भेद असतात त्याला स्वगत भेद म्हणतात. एक वृक्ष दुसऱ्या वृक्षाहून भिन्न असतो याला स्व जातीय भेद असे म्हणतात. वृक्षाहून इतर वस्तू त्याहून भिन्न उदा. दगड, माती इत्यादी याला विजातीय भेद म्हणतात. चातुर्वर्णात्मक जे भाग कल्पिले गेले आहेत ते स्वगत भेदाचे म्हणजे एकाच विराट पुरुषाच्या शरीराचे भिन्न अवयव मात्र आहेत. आणि त्याच्या स्वास्थ्यासाठीच हे अवयव कार्यरत होत असतात. हाच अर्थ ध्वनित केलेला आहे. इथे कोणताही अवयव कमी वा आधिक महत्वाचा नाही. प्राणतत्त्व पंचधा कार्यान्वित होत असल्याने पंचप्राण ही संज्ञा त्याला प्राप्त झालेली आहे. प्राणतत्व हे एकत्त्व आहे. त्याचप्रमाणे एकच ब्रह्म शक्ती वेगवेगळ्या गुणधर्मांनी युक्त झालेली आहे. इतकाच त्याचा अर्थ संभवतो. त्यामुळे इथे उच्च नीच वा श्रेष्ठ कनिष्ठ अशी प्रतवारी संभवत नाही.

आता चार या संख्येचेही अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण ब्रह्म हे एक पादानेच व्यक्त झाले असून त्याचे तीन पाद अव्यक्त आहेत. ''पादोऽस्य विश्वाभूतानि। त्रिपादस्य अमृतं दिवि'' (पु. सूक्त) व्यवहारातही प्राणी चार पायावर स्थिर उभा राहू शकतो असेच पाहतो. मानवाला पाय दोनच असले तरी त्याला मन व बुद्धीद्वारे आपली स्थिरता सांभाळता आलेली आहे.

### स्मृतिकार व चातुर्वर्ण्य :

या कल्पनेचा मागोवा घेत स्मृतिकाराने प्रत्येक वर्ण विभागाचे समाजातील स्थान व त्यांची कर्तव्ये या बद्दल विचार केला. अध्ययन व अध्यापन म्हणजे ज्ञान दान हे कार्य विशेषत्वाने वाणीच्या द्वारे होत असल्याने त्याचे प्रतीक रूप बाहुला राजन्य म्हटले. राजन्य याचा अर्थ क्षत्रिय व इतर कामे कृषि, गोरक्षा आणि व्यापर उदीम याचे प्रतीक मांड्या, याला वैश्य संज्ञा दिली. व कारागिरी, कौशल्य, परिश्रम या साऱ्याचे प्रतीक पाय याला शूद्र असे कल्पिले. या रीतीने संपूर्ण समाजात सर्व गोष्टी स्पर्धा विरहित पार पडतील व अत्यंत कुशलतेने पूर्ण होतील हे पाहण्यात आले.

कालांतराने या पद्धतीत हळूहळू शिथिलता निर्माण झाली व ही चौकट विस्कळीत होऊ लागली. याच सुमारास बुद्ध व जैन या दोन पंथियानी या चौकटीवर चौफेर प्रहार केला. व ती पूर्ण खिळखिळी करून टाकली. यामुळे ब्राह्मण व क्षत्रिय हे दोनही विभाग (वर्ण) नामशेष झाले. यज्ञ संस्था उध्वस्त झाली. अहिंसेचे स्तोम माजले. वेदांचे महत्त्व कमी झाले. अहिंसा हा परवलीचा शब्द झाल्याने क्षात्रवृत्ती नष्ट झाली. राहिले फक्त व्यापारी आणि परिश्रम करणारे नोकर. ब्राह्मण भिक्षुक वृत्तीने जगू लागले. क्षत्रिय व्यापारी बनले. आणि चातुर्वर्ण्याची चौकट पूर्ण कोलमडली.

### सावरण्याचा अयशस्वी प्रयत्न :

वेदाचा अर्थ समजेनासा झाला. जो तो आपल्या कल्पनेने अर्थ लावून वेगवेगळ्या चुली मांडू लागला. वैदिक कालीन जीवन पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न झाला. कुमारील भट्टाने कर्मकांडाचे पुनरुज्जीवन केले. आद्य शंकराचार्यांनी ज्ञान कांडाला उजाळा दिला, आणि चिरंतन स्वरुपाच्या अद्वैत तत्त्वज्ञानाची देणगी जगाला दिली. श्री रामानुजाचार्यांनी उपासना कांडाला चालना दिली. व सर्वदूर भक्ति संप्रदाय पसरविला. आर्ष महाकाव्ये - रामायण, महाभारत यातील महापुरुष विशेषत: राम व कृष्ण हे उपास्य दैवते झाली. तसेच पुराण ग्रंथाद्वारे वैदिक विचार सामान्यजनापर्यंत पोचविण्याचे कार्य केले. चातुर्वर्ण्याची विस्कटलेली घडी पुन्हा काही साधता आली नाही. अशा रीतीने एका चांगल्या एकसंध ठेवणाऱ्या समाज पद्धतीचा असा विचका झाला. आज हिंदू समाज हा जातीवर आधारित आहे. वर्ण शब्द इतिहास जमा झाला आहे हे विसरता कामा नये.

---

काळजी ''घ्यावी'' म्हणजे काळजी ''करण्याचा'' प्रसंग येणार नाही.

**आश्रमव्यवस्था :**

वर्णाची काय दुर्दशा झाली आहे हे आपण पाहिले. आता आश्रम या भूमिकेकडे पाहू. सुधारणेचा केंद्र बिंदू मानव असल्याने त्याच्या ठिकाणी जीवन मूल्यांची निष्ठा उत्तम पद्धतीने निर्माण झाल्यास सामाजिक स्तर सुदृढ होऊ शकतो, म्हणून व्यक्तिमत्वविकासाकडे लक्ष पुरवून ती व्यक्ती अंतिम मानवी ध्येयाप्रत कशी जाईल या विचाराने आश्रमांची रचना करण्यात आली. आश्रम या शब्दातच श्रमाचा विचार व्यक्त होत आहे. प्रत्येक व्यक्तीला श्रम हे करावेच लागतात. श्रमासाठी शास्त्रशुद्ध बैठक कशी असावी हा विचार प्रामुख्याने या आश्रम भूमिकेत आहे. सर्व प्रथम प्रत्येक मानवाला शारीरीक व मानसिक क्षमता प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. करता वयाच्या ८ व्या वर्षापासून पुढील १२/१४ वर्षे विद्यार्जन, बल साधन कसोशिने करावे यासाठी ब्रह्मचर्य आश्रमाची योजना केली. बळ व ज्ञान संपादनासाठी इंद्रियेताब्यात ठेवण्याचे शिक्षणही दिले जाई. सुखलोलुप झाल्यास या दोन ही गोष्टी प्राप्त होणार नाहीत. ''सुखार्थिनः कुतो विद्या। विद्यार्थिनः कुतःसुखं।'' या काळात सर्व प्रकारचे अध्ययन करून पुढील काळी सर्व जबाबदारी समर्थपणे स्वीकारता यावी. याची तयारी या आश्रमात अभिप्रेत आहे.

**गृहस्थाश्रम :**

धन्यो गृहस्थाश्रमः। गृहस्थाश्रम हा सर्वात उत्कृष्ट व श्रेष्ठ असा आश्रम मानला गेला आहे. या आश्रमात कुटुंबाची आणि सामाजिक ऋणांची जबाबदारी पार पाडावयास मिळते. उपजीविका व्यवस्थित चालावी यासाठी अर्थ संपादन करणे, कुटुंबातील सर्व लोकांचे पोषण करणे तसेच साधु, संत, बैरागी, आपद्ग्रस्त, अपंग यांची देखभाल करणे असा व्यवहार करीत पुढील पिढीला एक आदर्श घालून देणे आणि समाज सुदृढ करणे ही महत्त्वाची कामे या आश्रमाशी निगडित आहेत असा संसार करून मुले मोठी झाली व संसाराचा भार पेलण्याइतपत कार्यक्षम झाली आहेत. हे पाहून त्याजवर संसार भार सोपवून आपण त्यांतून मुक्त होणे व पुढील मार्ग आक्रमण करणे घडत असे.

**वानप्रस्थ आश्रम :**

या पुढील आश्रम वानप्रस्थ होय. या आश्रमात चिंतन शीलता वाढीला लागावी, जीव जगत् जगदीश संबंधीचा विचार स्पष्ट व्हावा व त्यातून उपासनेकडे मनाचा कल व्हावा अशी योजना होती. या आश्रमाने दोन महत्वाचे भाग साधले जात. तरुण पिढीला वाव मिळत असे व आपले उर्वरित आयुष्य देव सेवेत घालवण्यास अवसर प्राप्त होई. अशा रीतीने वृद्धांचा प्रश्न हा सोडवलेला होता.

**संन्यास आश्रम :**

हा सर्वात शेवटचा आश्रम. उपासनेतून मानव आत्मतत्वाकडे वळत असे आणि ते जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण होई. सर्व इच्छा, कामना, आदींचा त्याग करून संन्यस्त वृत्तीने जीवन जगत असे. त्या विराट पुरुषाचे मी केवळ अंग प्रत्यंग नसून तोच मी आहे असा अनुभव घेण्यासाठी तो प्रयत्नशील होत असे हा अनुभव यावा, आपण ब्रह्मस्वरुपच आहोत, हे सारे ब्रह्म आहे व मी पूर्ण आहे, या पूर्णतेतच जीवनाचे सार साठलेले आहे हे या आश्रमामुळे मानवाला घेता येणे शक्य झाले.

आश्रम पद्धतीची कल्पना कालिदासाने आपल्या रघुवंश या काव्यात रघुकुळातील राजे लोकांचे वर्णन करताना मांडलेली आहे.

आपल्या वेद वाङमयाचे चार भाग कल्पिले आहेत. संहिता, ब्राह्मण आरण्यक आणि उपनिषद, देवतास्तुती पूर्वक मंत्राना संहिता म्हणतात, यज्ञ विशद करणाऱ्या भागाला ब्राह्मण म्हणतात, तत्त्व चिंतनासाठी उपयुक्त असलेल्या भागाला आरण्यके म्हणतात, व ब्रह्मज्ञान करून देणाऱ्या ग्रंथांना उपनिषदे म्हणतात. आश्रमाच्या प्रत्येक भागाला उपयुक्त ग्रंथ निर्माण झालेले होते. काही विद्वानांच्या

मते या ग्रंथांची निर्मिती एकामागून एक झाली असे मानले जाते. मात्र आश्रम पद्धती अस्तित्वात आली तेव्हा हे सारे ग्रंथ उपलब्ध होते.

आज एकच आश्रम ज्ञात आहे. तो म्हणजे गृहस्थाश्रम परंतु त्याही आश्रमातील कर्तव्ये पार पडताना मानव आढळत नाही. लग्न करून संसार थाटणे व प्रजोत्पादन करणे एवढ्या मर्यादित स्वरूपातच त्या आश्रमाची कर्तव्ये पार पाडली जातात.

**उपसंहार :**

हिंदू समाजाची चोहोबाजूंनी कुतरओढ चालू आहे. आज तो समाज म्हणून न जगता विविध जातीने पूर्ण पोखरलेला असा आहे. समाज या भावनेने कोणत्याही क्षेत्रात - राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक वा आंतरराष्ट्रीय - आज तो जगत नाही. सामाजिक एकत्वाची बैठक पूर्ण विस्कळीत झालेली आहे. चातुर्वण्याविषयी बोलणे देखील निंद्य आहे. आता नवीन विचारसरणीला धरून समाजाची बांधणी करणे आवश्यक आहे.

बौद्धिक स्तरावर बुद्धिमान तत्ववेत्त्याकडून समाजाची घडण करणे व सामंजस्य निर्माण करणे आवश्यक आहे. जेणेकरून समाजात ज्ञानवंत, प्रज्ञावंत, यशवंत, कार्तिवंत, श्रेष्ठ व्यापारी धनवंत व उत्तम कारागीर परिश्रमाबद्दल सर्वांनाच आवड निर्माण होईल. थोडक्यात, वैयक्तिक विकास, साधून समाजहिताला जपणारी वृत्ती प्रजेत निर्माण होणे आवश्यक आहे. तरच यावर सामाजिक नैतिकता, सुरक्षितता, वैचारिक प्रगलभता आणि वैयक्तिक विकास अवलंबून राहील. तसेच देशात उत्पादकता करण्यासाठी धनवंतांची व कुशल परिश्रम करणाऱ्या लोकांची आवश्यकता पूर्ण करता येईल.

अशा प्रकारे, राज्यात, राष्ट्रात व विश्वात मानवी व्यवहार सुरळीत चालेल. ही योजना केवळ भारतापुरतीच मर्यादित न ठेवता आखिल विश्वात प्रसार करता येईल. हे विभाग गुणानुरुप त्या त्या मानव समूहाकडून प्रवर्तित होत असल्याने कोणत्याही मानवाला आपल्या कलेनुसार त्या त्या समूहात सहज समावेश करता येईल आणि स्वत:चे व समाजाचे हित साधता येईल.

आश्रमाचे पुनरुज्जीवन अत्यंत कठीण आहे. प्रस्तुत लेखात त्याचा विचार केलेला नाही. जाती संस्था या आजकाल कधी नव्हत्या इतक्या प्रबल झाल्या आहेत. जरी धुरीण मंडळी व्यासपीठावरून जाती विरहित समाजाचे विचार मांडत असले तरी मत पेटीच्या द्वारे राज्य करण्याच्या भूमिकेमुळे उमेदवार जातिनिष्ठच निवडल जातो. स्वातंत्र्योत्तर काळानंतर जाती बलिष्ठ झाल्या आहेत. हे बदलावयाचे असल्यास, राजकीय क्षेत्रात मतपेटीचे आकर्षण तसेच जाती निहाय आरक्षण याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

आपल्याला आणखी एका गोष्टीचा विचार प्रामुख्याने करावा लागेल. आणि ती गोष्ट कर्मावर आधारित आहे. आपण श्रम विभाग मानले पण श्रम प्रतिष्ठा मानली नाही. सर्व प्रकारचे कर्म हे समाजासाठी आवश्यक असल्याने कोणतेही काम श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही ही भावना समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. याकडे दुर्दैवाने कोणाही स्तरावरील लोकांचे लक्ष गेलेले नाही असे दिसते. हलके काम करणारा हलक्या प्रतीचा, दर्जेदार काम करणारा प्रतिष्ठित ही भूमिका याच्या मागे आहे. यात धर्म, राजकारण, अर्थकारण, समाजकारण व योग्य शिक्षण या सर्वांचा सहभाग आहे. याची योग्य बांधणी होणे आवश्यक आहे. श्रम प्रतिष्ठेचे तत्व आपण अंगीकारल्या शिवाय हा श्रेष्ट कनिष्ठ भाव कदापि कमी होणार नाही.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

### ➢ एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१० – २०११ :

| एलिमेंटरी श्रेणी परीक्षा | इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा |
|---|---|
| एकूण विद्यार्थी – ३२ | एकूण विद्यार्थी – २९ |
| उत्तीर्ण विद्यार्थी – ३० | उत्तीर्ण विद्यार्थी – २७ |
| 'अ' श्रेणी – ०४ | 'अ' श्रेणी – ०२ |
| 'ब' श्रेणी – ०४ | 'ब' श्रेणी – ०९ |
| 'क' श्रेणी – २२ | 'क' श्रेणी – १६ |

### ➢ निरोप समारंभ :

'नेमेचि येणाऱ्या' पावसाळ्या प्रमाणेच इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा समारंभ म्हणजेच निरोप समारंभ ह्यावर्षी २८ जानेवारी रोजी पार पडला. अर्थातच आमच्या शाळेत निरोप समारंभ नेहमीच्याच पारंपारिक पद्धतीने न करता वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. शाळा सोडून जातानाही विद्यार्थ्यांच्या मनावर एखादा चांगला संदेश चांगला विचार कोरला जावा, हा त्यामागील उद्देश असतो. हाच हेतू मनात धरून ह्यावर्षी वन्यजीवन प्रेमी मयूर कामत यांना आमंत्रित केले होते.

शाळेच्या सभागृहात कार्यक्रमाला सुरुवात झाल्यावर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कलिंदी कोल्हटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या असा शालांत परीक्षेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेचे दरवाजे त्यांच्या नेहमीच उघडे असतील असे आश्वासनही दिले. वन्यजीवनावर माहितीपट बनवणारे श्री. मयूर कामत यांनी स्लाईड्स व्दारे वन्यजीवनाविषयी रोमांचक माहिती सांगितली लहानपणापासूनच वन्य प्राण्यांविषयी त्यांना जिव्हाळा वाटत होता. पॉलिमर इजिनियरींगचे शिक्षण पूर्ण केल्यावर त्याच जिव्हाळ्याला त्यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय बनवले. शहरात आलेल्या, संकटात सापडलेल्या अनेक वन्य प्राण्यांची त्यांनी स्वत:च्या जीवावर उदार होऊन सुटका केली. वन्यजीवनावर आधारित त्यांच्या 'होप' ह्या माहितीपटास पारितोषिकही मिळाले आहे. त्यांच्या माहितीपूर्ण भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीवांविषयी प्रेम आणि पर्यावरणाविषयी जागृती निर्माण होण्यास नक्कीच मदत होईल.

श्री. मयूर कामत यांच्या भाषणानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आणि कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

### ➢ इतिहास प्रज्ञा परीक्षा २०१० :

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | २० | १९ |
| ८ वी | ४१ | २६ |
| १० वी | ५४ | ५२ |

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | अर्थव जोशी | ८६ |
| ८ वी | परिता दानोले | ७४ |
| | नेहा पुसाळकर | ७४ |
| १० वी | श्रेया जोशी | ९६ |
| | प्राची जेस्वाल | ९६ |

➢ **आंतरशालेय भिंत रंगवणे स्पर्धा :**

रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ आयोजित आंतरशालेय भिंत रंगवण्याच्या स्पर्धेत आमच्या शाळेला द्वितीय क्रमांक मिळाला. भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे : प्रज्ञा चाळके, अर्चना जाधव, रुचा रसाल, श्रेया जोशी आणि नीतला पारकर.

➢ ठाण्यात झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात आमच्या शाळेतील खालील विद्यार्थ्यांनी 'स्वाभिमान गीत' गाण्यात भाग घेतला. विद्यार्थ्यांची नावे : सिमरन भांगले, मिताली राजपूत, अदिती गोखले, ओंकार गोखले, देवश्री संझगिरी.

**जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय :**

के. ग. जोशी कला महाविद्यालय आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय आयोजित '१९ व्या व २० व्या शतकातील मराठी व्याकरण, शब्दकोश आणि ज्ञानकोशाचा इतिहास' या विषयांचे प्रदर्शन तंत्रनिकेतनच्या इमारत क्र. १ मध्ये आयोजित करण्यात आले होते. डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांचे शुभहस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन दि. २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.०० वाजता करण्यात आले. या प्रसंगी प्रा. नारायण बारसे (ग्रंथालय प्रमुख जोशी - बेडेकर महाविद्यालय, ठाणे) यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करुन प्रदर्शनामागची भूमिका स्पष्ट केली. डॉ. विजय बेडेकर यांचे हस्ते एका पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यांनी विस्तृत अशा भाषणामध्ये भाषा संस्कृती, आणि संशोधन इत्यादी परामर्श घेतला शिवाय मराठीच्या भल्यासाठी उपस्थित तरुणांनी पुढाकार घेऊन कोणत्याही वादात न अडकता प्रमाणित भाषा कशी विकसित होईल याकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. श्रीपती या मराठीतील भाषातज्ज्ञाविषयी त्यांनी विशेष माहिती करुन दिली. जवळ जवळ दोन तासाहून अधिक वेळ केलेल्या अभ्यासपूर्ण व कळकळीच्या भाषणाचा विशेष भर तरुणांनी भाषा आणि संस्कृतीकडे कोणत्या गांभीर्याने पाहिले पाहिजे यावर होता. त्यांच्या प्रत्येक वाक्यात अशी तळमळ होती की, जागतीक पातळीवर आपली भाषा विकसित व्हायला पाहिजे. जागतिक भाषा होण्यासाठी त्या भाषेचे युनिकोडींग झाले पाहिजे व त्या भाषिक माहिती तंत्रज्ञानाची जोड देवून सर्वत्र तिचा प्रसार होण्यास मदत होईल असेही त्यांनी प्रतिपादन केले.

त्यांनी विद्या प्रसारक मंडळ करीत असलेल्या उपक्रमांचाही परामर्श घेतला. सामाजिक जाणिवेतून समाजाला स्तुत्य असे ठरणारे उपक्रम राबविण्यासाठी विद्या प्रसारक मंडळ सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून www.granthalaya.org या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांनी आपल्याकडे असलेल्या ग्रंथांची यादी / ग्रंथसाठ्याची माहिती या संकेत स्थळावरुन प्रसिद्ध केली तर अभ्यासकांची व संशोधकांची फार मोठी सोय होणार आहे. जवळ जवळ सात लाखाहून अधिक ग्रंथांची माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध झाली आहे. त्यात भर घालण्यासाठी सार्व. ग्रंथालयांनी ग्रंथांची माहिती पाठविण्याचे आवाहनही केले.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रदर्शनाला तंत्रज्ञानाची जोड देवून प्रमुख तज्ज्ञाच्या भाषणाचा दृक-श्राव्यांचा अव्याहत लाभ उपस्थितांना घेता येत होता.

तज्ज्ञांचे विषय आणि त्यांनी दृक-श्राव्य पद्धतीने केलेल्या भाषणाचे विषय खालीलप्रमाणे

| तज्ञाचे नाव | विषय |
|---|---|
| १. डॉ. विजय बेडेकर कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे. | - सोहळे, भाषा आणि गुलामी<br>- भाषा आणि संस्कृती<br>- भूमिका |

| | |
|---|---|
| २. प्रा. नारायण बारसे ग्रंथपाल, जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे | - १९ व २० व्या शतकातील मराठी व्याकरण, शब्दकोश ज्ञानकोशाचा संक्षिप्त इतिहास |
| ३. प्रा. दामोदर मोरे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे | - मराठी कवितेचा प्रवास |
| ४. प्रा. संतोष राणे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे | - मराठी कादंबरीचा प्रवास |

१९ व्या व २० व्या शतकातील मराठी व्याकरण शब्दकोश, आणि ज्ञानकोशाचा संक्षिप्त इतिहास मांडण्यात आला होता. छायाचित्रासह त्यांची थोडक्यात (संक्षिप्त) माहिती देण्यात आली होती. दुसरी योगायोगाची गोष्ट म्हणजे याच दरम्यान ठाण्यात मराठी ग्रंथसंग्रहालय आयोजित आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन दादोजी कोंडदेव स्टेडियम मध्ये करण्यात आले होते.

१९ व २० व्या शतकातील मराठी व्याकरण, शब्दकोश आणि ज्ञानकोशांचा संक्षिप्त इतिहासाचे प्रदर्शन हे २४ डिसेंबर ते ३० डिसेंबर पर्यंत सर्वांसाठी खुले होते. या प्रदर्शन उद्‌घाटनास श्री. मा. य. गोखले, (कोषाध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग (जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे) प्राचार्य दि. कृ. नायक (वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) इ. मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनादरम्यान जो तांत्रिक भाग ज्यांनी हाताळला व प्रदर्शन नावीन्यपूर्ण स्वरुपात सादर करण्यात ज्यांचा सिहाचा वाटा असणारे श्री. कौस्तुभ काळे व त्यांचे सहकारी, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, नागरिक इत्यादींची प्रदर्शन उद्‌घाटनास उपस्थिती होती

- वृत्तसंकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे

## वा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

वा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी मुंबई विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा **''उत्कृष्ट महाविद्यालय''** हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित शहरी भागातील महाविद्यालयाची या पुरस्काराकरिता निवड झाली आहे.

**६२ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनी** मुंबई विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू **डॉ. राजन वेळुकर** यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या **प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर** यांनी बांदोडकर महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी व विद्या प्रसारक मंडळ यांच्या वतीने हा पुरस्कार कविवर्य कुसुमाग्रज मराठी भाषा भवन विद्यानगरी येथे स्वीकारला.

महाविद्यालयामध्ये उपलब्ध सर्व सोयीसुविधा, नवनवीन शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांचे कला व क्रीडा क्षेत्रांतील नैपुण्य, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून महाविद्यालयाने केलेला विकास, महाविद्यालयाचे समाजोपयोगी कार्य, शिक्षकांनी लिहिलेले प्रबंध, सादर केलेले शोधनिबंध व संशोधन कार्य या सर्व बाबी लक्षात घेऊन हा मानाचा पुरस्कार दिला जातो.

मागील वर्षी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती राष्ट्रीय परिषद (नॅक) यांनी बांदोडकर महाविद्यालयास 'अ' श्रेणी बहाल केली होती व या वर्षी **''उत्कृष्ट महाविद्यालय''** असा पुरस्कार प्राप्त झाला. बांदोडकर महाविद्यालयाच्या या यशाबद्दल मुंबई विद्यापीठाने विद्या प्रसारक मंडळ महाविद्यालयाच्या प्राचार्या, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व विद्या प्रसारक मंडळ याबद्दल मुंबई विद्यापीठाचे आभारी आहेत.

➢ 'इंटेलिजन्स सिस्टीम्स'

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे दि. २६ व २७ नोव्हेंबर रोजी 'इंटेलिजन्स सिस्टीम्स' या विषयावर राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाची पूर्वतयारी म्हणून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये 'इंटेलिजन्स सिस्टीम्स' हाच विषय घेऊन दोन अभिनव कार्यशाळा दि. २४ जुलै व २५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. आजच्या तरुण पिढीमध्ये संशोधनवृत्ती जागृत करून नोकरीच्या संधी स्वत:साठी स्वत:नेच उपलब्ध करण्याच्या उद्दिष्टाने या राष्ट्रीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या संमेलनाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले. या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेंद्र सोनार *(Associate Professor of IS/IT at SJMSOM, IIT Bombay and Founder, iKen Solutions Pvt Ltd)* उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी 'इंटेलिजन्स सिस्टीम्स चा उपयोग बिजनेस इंटेलिजन्स मधे कसा केला जातो, हे समर्पक उदाहरणांनी दाखवून दिले.

सदर संमेलनामध्ये आर्टीफिशल न्यूरल नेटवर्क्सची तुलना यावर श्री. के. एन. नंदुरकर यांनी, तसेच एम्बेडेड सिस्टीम आणि रोबोटिक्स बद्दल झाकी अन्वर हमदानी व वर्ल्ड ऑफ रोबेटिक ऑटोमेशन यावर श्री. प्रशांत दीक्षित यांनी अतिशय अभ्यासपूर्ण व समर्पक दाखले देऊन संमेलनाला उपस्थित सर्व श्रोत्यांना माहिती दिली. संध्याकाळच्या सत्रात श्री दिनकर बोरडे *(Scientist-Telecommunication Engineer, Former Technology Consultant, Govt of India)* यांनी अतिशय खुमासदार शैलीत मुलांशी गप्पा मारल्या. मुलांना फक्त गुणपत्रिकेवरचे गुण हे महत्वाचे नसून त्याचबरोबर आपल्यामधे संभाषण कौशल्य आणि नेतृत्वगुण यांची आवश्यकता आहे हे देखील पटवून दिले.

यासोबत बांदोडकर महाविद्यालयातील व संमेलनाला उपस्थित इतर महाविद्यालयांतील शिक्षकांनी तांत्रिक सादरीकरणे सादर केली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श्री राजन वेळुकर हेदेखील उपस्थित होते.

➢ आकांक्षा

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन ''आकांक्षा'' ची सुरुवात दिनांक १७ डिसेंबर रोजी झाली. यंदाही मेंदी, नववधू मेकअप, केशभूषा, फुले सजावट, रांगोळी, सॅलेड बनवणे अशा विविध कलात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. केदार काळे व स्नेहल काळे यांना मिस्टर बांदोडकर व मिस बांदोडकर म्हणून घोषित करण्यात आले. एकपात्री अभिनय व मिमिक्री स्पर्धेत हिना शेख हिला प्रथम पारितोषिक मिळाले. सोलो नृत्य या स्पर्धेमध्ये सोफिया कोळी विजयी झाली. इन्स्ट्रुमेंटल मध्ये पुरुषोत्तम माने तर कमलेश बच्छाव व शरण्य शेनॉय यांनी लाइट व्होकल म्युझिकमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.

➢ साहित्य सहवास :

साहित्य सहवासतर्फे दिवंगत कवी श्री नारायण सुर्वे यांच्यावर आधारित एक कार्यक्रम दि. ७ डिसेंबर रोजी आयोजित केला होता. यावेळी 'नारायण गंगाराम सुर्वे' ही पुरस्कारप्राप्त डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली होती. तसेच, यावेळी श्री प्रकाश माळी, श्री पारधी, श्री भुसारा, ए डी आठवले, श्री धुमाळे प्रा. सुधीर भोसले व प्रा. भालचंद्र मांडलेकर या प्राध्यापकांनी श्री नारायण सुर्वे यांच्या कविता यावेळी सादर केल्या.

➢ **अभिनंदन :**

कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य **श्री आर. टी. कुलकर्णी** हे निवृत्त झाले व आता **श्री एच. बी. काटकर** गणित विभाग यांची उपप्राचार्य या पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जीवशास्त्र विभागाच्या **डॉ सौ मंगला बोरकर** यांची कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

➢ **करिअर मेळावा :**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये दि. २९ व ३० नोव्हेंबर रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरिता करिअर मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याचे उद्घाटन डॉ. पी. एम. केळकर, संचालक, डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था यांच्या हस्ते झाले. तसेच दि. १ व २ डिसेंबर रोजी वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरिता करिअर मेळाव्याचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना बारावी नंतर व पदवीधर झाल्यानंतर करिअरमध्ये उपलब्ध असलेल्या संधीची माहिती करून देण्याच्या उद्देशाने सदर मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याला वृत्तपत्रविद्या, अभियांत्रिकी शाखा, परदेशातील शिक्षण, हॉर्टिकल्चर, परदेशी भाषा, पर्यटन व्यवस्था, फार्मासी, ग्रंथालय व माहितीशास्त्र, स्पर्धा परीक्षा व्यवस्थापन, एविएशन इंडस्ट्री, बँकींग सेक्टर वित्त शाखा, संख्याशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आदी क्षेत्रांत कार्यरत कार्यरत असलेल्या नामांकित तज्ज्ञांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

➢ **अभिनंदन :**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापक हे २०१०-२०११ या वर्षात काही पुरस्कारांचे मानकरी आहेत त्याचा तपशील

१. **प्राचार्या डॉ सौ माधुरी पेजावर** विभागप्रमुख प्राणिशास्त्र विभाग यांना ठाणे जनता सहकारी बँकेच्या वतीने **''पर्यावरण मित्र पुरस्कार''** प्रदान करण्यात आला आहे.

२. **प्रा. एन. डी. मांडगे** भौतिकशास्त्र विभाग यांना ठाणे महानगरपालिकेच्या वतीने **''ठाणे गौरव''** हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

३. **डॉ सौ. विंदा मांजरमकर** प्राणिशास्त्र विभाग यांना न्यायिक लढा यांच्या वतीने **''न्यायिक लढा समाजभूषण पुरस्कार''** देण्यात आला आहे.

४. **डॉ. सौ. अनिता गोस्वामी गिरी** रसायनशास्त्र विभाग यांना सावली शिक्षण प्रसारक मंडळ व मैत्री संस्था यांच्या वतीने **''यशवंतराव चव्हाण समता गौरव पुरस्कार''**, राष्ट्रीय महिला व अपंग विकास प्रशिक्षण संस्था (राज्यस्तरीय) यांच्या वतीने **''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आदर्श समाजसेविका पुस्कार''**, न्यायिक लढा पत्रकार सेवा संघ यांच्या वतीने **''शिक्षण भूषण पुरस्कार''** आणि अखिल भारतीय कला साहित्य संस्कृती अकादमी यांच्या वतीने **''लोकरत्न राष्ट्रीय पुरस्कार''** असे चार पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

५. **डॉ. मोजेस कोलेट** वनस्पतिशास्त्र विभाग यांना भारत सरकार तर्फे **राष्ट्रीय छात्र सेना प्रदीर्घ सेवा पदक** प्रदान करण्यात आले.

६. कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या **प्रा प्रकाश माळी** यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा **''आदर्श शिक्षक पुस्कार''** अपंग मैत्री संघटनेतर्फे राज्य स्तरीय **''अपंग मित्र पुरस्कार''**, आखिल भारतीय महिला समिती तर्फे राज्य स्तरीय

**''क्रांति ज्योती पुरस्कार''**, न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्थेतर्फे राज्य स्तरीय **''बाल साहित्य मित्र पुरस्कार''**, सावली शिक्षण प्रसारक मंडळ व मैत्री संस्था यांच्यातर्फे **''यशवंतराव चव्हाण समता गौरव पुरस्कार''**, हिंदवी स्वराज्य संघटना व सावली शिक्षण प्रसारक मंडळ तर्फे **''लोकमान्य टिळक समाजभूषण पुरस्कार''** योगप्रिया सामाजिक प्रतिष्ठान तर्फे **''योगप्रिया भारतभूषण पुरस्कार''**, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे **''आदर्श शिक्षक गुणगौरव प्रमाणपत्र''**, अहमदनगर वार्ता मासिक यांच्यातर्फे **''महाराष्ट्र सुवर्ण गौरव पुरस्कार''**, युवा समूह प्रकाशन अखिल भारतीय कला साहित्य संस्कृती अकादमी वर्धा यांच्याकडून **''लोकरत्न राष्ट्रीय पुरस्कार''** असे दहा पुरस्कार बहाल करण्यात आले आहेत.

- **संयुजा प्रकाशन :**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम दि. ११ जानेवारी रोजी पार पडला. सकाळच्या सत्रात जिमखाना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम **श्रीशिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री प्रमोद केळकर** यांच्या हस्ते पार पडला. यावेळी श्री. केळकर यांनी विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे हायकिंग व ट्रेकिंग करताना येणारे अनुभव सांगितले. तसेच या क्षेत्रामध्ये काम करण्याकरता जे विद्यार्थी उत्सुक आहेत त्यांना मदत करण्याकरता ते सदैव तयार आहेत असेही ते म्हणाले.

दुपारच्या सत्रात बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक संयुजाचे प्रकाशन **डॉ. जी. व्ही. कुलकर्णी, संचालक प्रगत अध्ययन केंद्र,** यांच्या हस्ते झाले. वेगवेगळ्या क्षेत्रात आपली चमक दाखवलेल्या विद्यार्थी व शिक्षकांना यावेळी गौरवण्यात आले. डॉ. कुलकर्णी यांनी यावेळी सर्व बक्षिस विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व सध्याच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. आपल्या महाविद्यालयाच्या संकुलामधे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत याचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा असेही ते म्हणाले. सध्याच्या माहितीच्या महाजालात माहिती मिळवणे हे अतिशय सोपे झाले आहे व आपल्या व्यवस्थापनाने ही सुविधा आपल्या महाविद्यालयात मोफत उपलब्ध करून दिली आहे याचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःचा विकास करणे निकडीचे आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या **डॉ सौ माधुरी पेजावर** यांनी यावेळी महाविद्यालयाच्या अहवालाचे वाचन केले तसेच **राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना सांस्कृतिक विभाग क्रीडा विभाग** यांनी वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांचा अहवाल त्यांच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी येथे सादर केला. **स्वप्निल विचारे** या विद्यार्थ्याने केलेल्या **संयुजा** नियतकालिकाच्या मुखपृष्ठाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

१. विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी - बेडेकर महाविद्यालयाने दिनांक ७ जानेवारी रोजी "Development of India through micro finance" या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. सदर चर्चासत्रात विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी "Micro - Finance in India - some human rights Concerns and the law" या विषयावर त्यांचा शोध प्रबंध सादर केला.

२. दिनांक ८ जानेवारी रोजी Telecommunication Dispute Settlement Appellate Tribunal (TD-SAT)

यांनी महाराष्ट्र ज्युडिशियन ॲकॅडमी भाईंदर येथे एका चर्चासत्राचे आयोजन केले होते. सदर चर्चासत्रात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. शिरपुरकर, मुबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. मोहित शाह व श्री. धनंजय चंद्रचूड व TD-SAT चे अध्यक्ष न्यायमूर्ती सिन्हा यांनी मार्गदर्शन केले. सदर चर्चासत्रासाठी माहाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. सी. के कुलकर्णी व श्री. राजकुमार गायकवाड व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

३. दि. १९ जानेवारी रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'Moot Court' स्पर्धा व 'File your PIL (तुमची जनहित याचिका दाखल करा) या विषयावरील स्पर्धा आयोजित केल्या होत्या. 'Moot Court' स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. सुरेश पायक व सौ. जान्हवी नवरे यांनी न्यायाधीश म्हणून काम पाहिले. सदर स्पर्धेमध्ये अभिषेक पाडुरंगी व निलाक्षी सागवेकर यांच्या गटाला पहिला क्रमांक मिळाला तर आदिती आठवले व पूजा ओक यांच्या गटाला दुसरा क्रमांक मिळाला तसेच 'File your PIL' स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे श्री. सुनील परांजपे व श्री. मनोज भट यांनी न्यायाधीश म्हणून काम पाहिले. निलाक्षी सागवेकर (तृतीय वर्ष), आदिती आठवले (तृतीय वर्ष), पूजा ओक (तृतीय वर्ष) यांनी या स्पर्धेत भाग घेतला. परीक्षकांनी सर्वच स्पर्धकांच्या कामाची प्रशंसा केली व त्यांना विजेते असल्याचे घोषित केले. सदर विद्यार्थ्यांच्या याचिकेची प्रत माहितीसाठी ग्रंथालयात ठेवली आहे.

४. दिनांक १३ जानेवारी रोजी महाविद्यालय व मजलिस या संस्थेच्या माध्यमातून कलम ४९८ - अ या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या मनीषा वाघ व मजलिस संस्थेच्या ॲड. नगमा व ॲड. नौशिन यांनी न्यायाधीश म्हणून काम पाहिले. सदर स्पर्धेमध्ये सौगात हुजरा, जाज्वल्या राघवन, अभिषेक पांडुरंगी व निलाक्षी सागवेकर यांनी पारितोषिके पटकावली.

५. संविधान दिवसाचे महत्व लक्षात घेऊन दरवर्षाप्रमाणे या ही वर्षी विधी महाविद्यालयाचे दिनांक २७ जानेवारी रोजी 'संविधान दिवस' साजरा केला. सदर कार्यक्रमासाठी मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता श्री. नितीन प्रधान व संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या दिवसाचे औचित्य साधून "Judicial Activism" या विषयावरील वक्त्यांनी मार्गदर्शन केले संविधान दिवसाचे महत्व साधून "Development of India through the Various amendments in the Constitution" या विषयावर स्पर्धा ठेवण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी ॲड. भरत खन्ना व श्री. अनंत गद्रे यांना न्यायाधीश म्हणून पाचारण करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये कु. आदिती आठवले, कु. निलाक्षी सागवेकर व श्री. जयेश गोखले यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. तर कु. पूजा ओक हिला उत्तेजनार्थ पारितोषिक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.

६. २६ जानेवारी रोजी पार पडलेल्या ७ व्या नानी पालखीवाला आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. निलाक्षी सागवेकर (तृतीय वर्ष) हिने दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

## वि. प्र. मंडळ तंत्रनिकेत

### पॉली -स्पार्क २०१० एक अनोखा वार्षिकोत्सव :

हिवाळी परिक्षा नुकतीच संपली अन् पॉली-स्पार्क २०१० या वार्षिकोत्सवाची चाहूल लागली. आपल्या नेहमीच्या रूटीन कामातून फारकत घेत सर्वच विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले.

पॉली-स्पार्क २०१० ची सुरुवात २८ डिसेंबर २०१० ला झाली. तंत्रनिकेतनच्या पॉली-स्पार्क कार्यक्रमाचा उद्देश हा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या बुद्धीमत्तेला व त्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा यासाठी त्यांना एक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न असतो. त्यासाठी पॉली-स्पार्कच्या माध्यमातून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

सांस्कृतिक कमिटीची मिटींग २२ डिसेंबर रोजी पार पाडली. व त्यामध्ये GS म्हणून SYIE चा विद्यार्थी विश्वकुमार शुक्ला व अॅसिस्टंट जनरल सेक्रेटरी म्हणून SYEPS ची विद्यार्थीनी कु. ईशा गुप्ता हिची निवड करण्यात आली. २८ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान सर्व Events चे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात जनरल सेक्रेटरीच्या भाषणाने करण्यात आली २८ डिसेंबर रोजी Group Matching day साजरा करण्यात आला. रांगोळी स्पर्धा, मेहंदी व टी - शर्ट पेंटिंग स्पर्धा पार पडल्या.




पॉली - स्पार्क २०१० च्या वार्षिकोत्सव कार्यक्रमातील एक नृत्याविष्कार

पारंपारिक दिवस २९ डिसेंबर रोजी पार पडला. सर्वांच्या आवडीची अंताक्षरी स्पर्धा त्याच दिवशी पार पडली. ३० डिसेंबर रोजी Derim day पार पडला. दुपारनंतर नृत्य व गायन स्पर्धा घेण्यात आली पारंपरिक व नवीन गाणी विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आली.

३१ डिसेंबर हा पॉली- स्पार्क कार्यक्रमाचा शेवटचा दिवस या दिवशी साडी-डे व टाय-किंग डे स्पर्धा पार पाडली. Talent हंट स्पर्धाही त्याच दिवशी घेण्यात आली. मि. पॉली-स्पार्क व मिस. पॉली स्पार्क घोषित करण्यात आले.

सन २०१०-२०११ चे पॉली - स्पार्क वार्षिकोत्सव स्नेहसंमेलन हे प्रा. ऋचा कोन्हाळे यांचे नेतृत्वाखाली व तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक समितीचे प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधींचे सहकार्य लाभले. या सर्वांचे सांस्कृतिक कार्यक्रमच्या प्रमुख प्रा. ऋचा कोन्हाळे यांनी आभार मानले

- वृत्तसंकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे

●●●

**नोंद**

**जागे अभावी श्री. यशवंत साने यांचा लेख या महिन्याच्या अंकात घेता आलेला नाही. दिलगीर आहोत.**

**- संपादक**

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी

स्वतंत्र वास्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवींवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

तुम्ही स्वतःला मेंढरू बनविल्यावर लांडगा तयारच असतो.